संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



Hero GIFT Grand Indian Festival of Trust

तडजोड नाही, फक्त नवीन HF-Deluxe

फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत*

~~₹68,868*~~ ₹64,868*

(₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)

कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक कार्डसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०६.११.२०२४ | अंक नं. २०७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!

खरेदी करा आणि जिंका! 31 दिवस 21 लाखांची बक्षिसे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा

राजपाल™

संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299

नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

काबरा एक्सप्रेस

डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध

गुजरात — अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर

मध्यप्रदेश — इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन

महाराष्ट्र — मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे

राजस्थान — उदयपुर, अजमेर, जयपुर | दिल्ली — मोरी गेट

साऊथ — बंगलोर, हैदराबाद, गोवा

अहमदनगर — नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112

EYE Q MEDIA

श्री बडीसाजन मंगल कार्यालय

आनंदऋषी हॉस्पीटलजवळ, माणिकनगर, अ.नगर

शुभ कार्यासाठी उपलब्ध आहे

शुक्रवार २०/१२/२०२४

इच्छुकांनी संपर्क साधावा.

9890071234/0241-2358574

शाळा/कॉलेजमध्ये आपल्या पाल्यांच्या सुरक्षेबाबत निश्चिंत व्हा...

ISO 9001 : 2015 Certified

Mandar Mulay

98222 94622 | 94220 87757

Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...

• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस

सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स

COMPRO Systems & Services

HDB Financial Services — From the trusted family of HDFC Bank | BAJAJ FINSERV

अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

PHILIPS | LG | Whirlpool | SONY | SAMSUNG | KENSTAR | JVC | Electrolux


# अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदावर डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा विजयी

### ट्रम्प यांना २७७ तर कमला हॅरिस यांना २२६ इलेक्ट्रोरल मते; रिपब्लिकन पक्षाने बहुमताचा आकडा गाठला



वॉशिंग्टन – अमेरिकेच्या अध्यक्षपदाचे निवडणूक निकाल समोर आले आहेत. रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष बनले आहेत. त्यांनी कमला हॅरिस यांचा पराभव करत पुन्हा एकदा अमेरिकेचे अध्यक्षपद मिळवले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी २७० चा बहुमताचा आकडा पार करत हा विजय मिळवला.

डोनाल्ड ट्रम्प यांना २७७ इलेक्टोरल मते मिळाली आहेत. त्याचवेळी कमला हॅरिस यांना केवळ २२६ इलेक्टोरल मते मिळाली आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजयानंतर डोनाल्ड ट्रम्प पत्नी मेलानिया ट्रम्प यांच्यासह त्यांच्या समर्थकांना संबोधित करायला पोहोचले. यावेळी ट्रम्प यांनी विजयाचा आनंद असल्याचे सांगितले, तसेच त्यांनी सर्व मतदारांचे आभार मानले आहेत. हा इतिहासातील सर्वात मोठा राजकीय क्षण असल्याचे ट्रम्प म्हणाले.

डोनाल्ड ट्रम्प आपल्या मतदारांना संबोधित करत म्हणाले, 'आम्ही मतदारांसाठी सर्व काही ठीक करणार आहोत. आपल्या देशाने याआधी कधीही न पाहिलेला हा ऐतिहासिक राजकीय विजय आहे. ४७ वे राष्ट्रपती म्हणून मी तुमच्यासाठी रोज लढेन. हा अमेरिकेचा मोठा विजय आहे, ज्यामुळे अमेरिका पुन्हा महान होईल. आपण देशाच्या सीमा अधिक मजबूत करु आणि देशातील सर्व प्रश्न सोडवू'.

मी तुमच्या कुटुंबासाठी आणि भविष्यासाठी लढणार असल्याचे आश्वासन डोनाल्ड ट्रम्प यांनी नागरिकांना दिले. आम्हाला स्विंग राज्यातील मतदारांचाही पाठिंबा मिळाला. पुढील चार वर्ष अमेरिकेसाठी सोनेरी असणार आहेत. जनतेने आम्हाला भक्कम जनादेश दिला आहे, असे म्हणत ट्रम्प यांनी जनतेचे आभार मानले.


काय आपण आपल्या जुन्या अपार्टमेंटच्या इमारतीच्या Redevelopment / Self-redevelopment चा विचार करीत आहात?

एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली "(UDCPR) नियमांमुळे नगर शहरात जुन्या इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) मोठ्या प्रमाणात सुरु आहे किंवा होणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने काही मार्गदर्शक नियम तयार केलेले आहेत व त्या मार्गदर्शकांच्या अधीन राहूनच आपण आपल्या इमारतीचा पुनर्विकास करणे गरजेचे आहे. यासाठी इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) करण्यासाठी योग्य व माहितगार (PMC) सल्लागार असणे गरजेचे आहे. PMC (Project Management Consultant) म्हणून आम्ही आपणास इमारतीच्या पुनर्विकास ची पद्धत, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, आपल्या अपार्टमेंटचा Feasibility Report तयार करुन जुन्या मूळ सभासदांना त्यांच्या हक्काचे होणारे फायदे मिळवून देणे, विकासक /ठेकेदार निवडण्याचे निकष, करारनामा कसा करावा, महारेरा नोंदणी इ .चे अचूक मार्गदर्शन व सल्ला आमची Team (Architect, CA, Structural Engineer, Legal Advisor, site Supervisor, etc) आपणास देईल तसेच आपल्या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होऊन राज्य सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सभासदांना वेळेवर ताबा मिळवून देण्यासाठी आमची Team आपल्या बरोबर राहील.

Er Prakash Jain B.E.(Civil) Mob : 9422220762

"Adarsh Consultancy"

( RERA & Redevelopment Consultant)

O-1, Adarsh Samruddhi Apt., Chowpatty Karanja, A'Nagar


# नगर शहरातून १० वर्षाच्या बालकाचे अपहरण

नगर – शहरातील बेलदार गल्लीत एका १० वर्षीय अल्पवयीन मुलाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलाच्या वडिलाने मंगळवारी (दि.५)) पहाटे दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सोमवारी (दि.४) रात्री १० वाजता त्यांचे ईलेक्ट्रीकल दुकान बंद करून घरी आले त्यावेळी त्यांना घरात त्यांची पत्नी व मुलगा दिसला नाही. त्यांनी मुलीकडे चौकशी केली असता मुलगा मित्राचा फुटबॉल देण्यासाठी गेला व परत आला नाही म्हणून आई त्याचा शोध घेत असल्याचे तिने सांगितले. त्यानंतर फिर्यादी, त्यांची पत्नी व इतरांनी मुलाचा नगर शहरात, नातेवाईकांकडे शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यामुळे त्यांनी मंगळवारी पहाटे तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पोलीस मुलाचा शोध घेत आहेत.


समर्थ पेस्ट कंट्रोल

झुरळ, पाल, मुंग्या, कोळी, मच्छर, वाळवी, ढेकुण, उंदीर, मधमाश्या, वाळवी यांच्या त्रासापासून खात्रीशीर मुक्तता तसेच घर, बंगला, दुकाने, गोडावून, ऑफिस, फॅक्टरिज, हॉटेल, पतसंस्था, बँक इ. ठिकाणी पेस्ट कंट्रोल करुन मिळेल.

9890692159, 9503105050


# डिक्कीत ठेवलेल्या रोकड व दागिन्यांसह मोपेडची चोरी

### सावेडीतील महामार्गावरील मॉल समोरील घटना; सव्वातीन लाख रुपयांचा ऐवज लंपास

नगर – होंडा कंपनीच्या ॲक्टिवा मोपेडच्या डिक्कीत ५ तोळे सोन्याचे दागिने आणि १२ हजारांची रोकड असलेली पर्स ठेवून मॉलसमोर मोपेड पार्क करून मॉल मध्ये गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने सदरची मोपेड चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.५) रात्री ७.२५ ते ८.१५ या कालावधीत सावेडीतील कोहिनूर मॉल समोर घडली.

याबाबत रोनक जितेंद्र शहा (वय ३३ रा. गुरुगणेश अपार्टमेंट, माळीवाडा) यांनी रात्री उशिरा तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी रोनक यांचे आई वडील मंगळवारी सायंकाळी मॉलमध्ये चित्रपट पाहण्यासाठी गेले होते. तर फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे दोघे खरेदीसाठी बाजार पेठेत गेलेल्या होत्या. रात्री ७.२५ च्या सुमारास ते दोघे मोपेड वर आई वडिलांना घेण्यासाठी मॉल येथे गेले.

तेथे त्यांनी मॉल समोर मोपेड उभी केली. त्यावेळी फिर्यादी यांच्या पत्नी यांनी ५ तोळे सोन्याचे दागिने आणि १२ हजारांची रोकड असा ३ लाख ३२ हजारांचा ऐवज असलेली पर्स व खरेदी केलेले कपडे मोपेड च्या डिक्कीत ठेवले. त्यानंतर दोघे पती पत्नी मॉल मध्ये गेले. रात्री ८.१५ च्या सुमारास ते मॉल च्या बाहेर आले असता त्यांना त्यांची मोपेड जागेवर दिसली नाही. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला परंतु मोपेड न दिसल्याने ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर रोनक शहा यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


मरणोत्तर नेत्रदानाची वाट, अंध जीवनाची चैतन्यमय पहाट...

"मरणोत्तर नेत्रदान करुया, दोन अंधाचे अंध:कारमय जीवन प्रकाशमान करुया.."

स्व. श्रीमती मानकुवरबाई हस्तीमलजी लोढा

लोढा परिवाराच्या योगदानाबद्दल शतशः ऋणी आहोत.

डॉ. कांकरियांचे

साई सूर्य नेत्रसेवा — दृष्टी साजरी करा

मान कन्हैया नेत्रपेढी

वर्धमान, माणिकचौक, अहमदनगर 414001

संपर्क मोबा.: 8888982222 / 9112288611

"सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील.. जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील.."

दशक्रिया विधी

कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, कै. बाबासाहेब किसन कांडेकर यांचे बुधवार दि.३०/१०/२०२४ रोजी देवाज्ञा झाली. त्यांचा

दशक्रिया विधी : शुक्रवार, दि.०८/११/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता

ठिकाण : कांडेकर वस्ती, निमगाव फाटा, निंबळक रोड येथे होणार आहे.

कै.बाबासाहेब किसन कांडेकर

(जन्म : दि.०१/०६/१९५३ । स्व-३०/१०/२०२४)

(माजी कृषि विस्तार अधिकारी)

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दुःखांकित :

गं.भा.मिराबाई बाबासाहेब कांडेकर (पत्नी)

डॉ.बापूसाहेब एकनाथ कांडेकर (भाऊ)

अशोक किसन कांडेकर (भाऊ)

प्रसाद बाबासाहेब कांडेकर (मुलगा)

सौ.वैशाली सोमनाथ शेटे (मुलगी)

समस्त कांडेकर परिवार

प्रवचन सेवा : ह.भ.प.श्रीनीवास महाराज घुगे (आळंदी देवाची)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आर्थिक स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य!

''पैसा सबकुछ नही लेकीन आज की दुनियामें बहुत कुछ है'' कलयुगाच्या स्वार्थी व प्रॅक्टीकल युगात तर ही वस्तुस्थिती आहे.

स्वातंत्र्य अनेक प्रकारचे आहेत. घटनेने दिलेले, वैयक्तिक वा अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य. पण पैसा मुबलक असणाऱ्यांना इतर प्रकारची स्वातंत्र्य अधिकच साजरे करता येतात. आर्थिक स्वातंत्र्य हे प्रत्येकाचे ध्येय असते, असावे. किंबहुना ते आजचे व विशेषतः उतारवयातील अत्यावश्यक गरज आहे. पण हे आर्थिक स्वातंत्र्य त्या त्या व्यक्तीच्या कामांवर, कष्टांवर व अर्थ साक्षरतेवर अवलंबून असते.

आयुष्याच्या ऐन तारुण्यात कष्टाची शिडी करीत कमावलेली कष्टाची फळे बचतीच्या व भविष्यकालीन फायदेशीर गुंतवणुकीत सुरक्षित ठेवणे गरजेचे ठरते

आर्थिक स्वातंत्र्य मिळण्यासाठी व्यक्तीच्या जीवनात शिस्त असायला हवी.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



मिळकत व खर्च याचा सुयोग्य मेळ घालून अधिकाधिक बचत करावी लागेल.

सुदैवाने नवी पिढी तंत्र सक्षम तर आहेच पण अर्थसाक्षरही बनत आहे. पारंपरिक जमीन, सोने याशिवाय म्युच्युअल फंड, शेअर मार्केट, कमोडिटीज इ. माध्यमातून ती अधिक उत्पन्न मिळवण्याचे प्रयत्न करीत आहे.

एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत असताना, वाढत्या शहरीकरण व आत्मकेंद्रीत वृत्तीमुळे तर उतारवयातील खर्च, आरोग्य सेवा सुविधा आणि स्वावलंबी राहण्यासाठी योग्य नियोजनपूर्वक अर्थस्वातंत्र्य मिळवता येणे आवश्यक आहे. त्यानंतरच आध्यात्मि कदृष्ट्या पैलतीराचा विचार करता येईल.

# दोन गटात हाणामारी; परस्पर विरोधी फिर्यादींवरून गुन्हा दाखल

नगर – घराशेजारी जेसीबीने खड्डा खोदल्याच्या कारणावरून शाब्दिक चकमक झाली आणि नंतर त्याचे रुपांतर हाणामारीत झाल्याची घटना नगर तालुक्यातील कामरगाव येथे घडली. दोन गटात लाकडी दांडके, दगडांनी झालेल्या हाणामारीत ४ ते ५ जण जखमी झाले असून या प्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादींवरून दोन्ही गटाच्या ११ जणांवर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हाणामारीची ही घटना शनिवारी (दि.२) सायंकाळी घडली. याबाबत शोभा बबन कातोरे यांनी जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून मंगळवारी (दि.५) शरद नामदेव कातोरे, राजेंद्र नारायण लाळगे, सविता शरद कातोरे, श्रवण शरद कातोरे, विजय नारायण लाळगे, अनिता विजय लाळगे, सुनिता राजेंद्र लाळगे (सर्व रा. कामरगाव, ता.नगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर सविता शरद कातोरे यांनी जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून बबन नामदेव कातोरे, शोभा बबन कातोरे, करण बबन कातोरे, रंजित बबन कातोरे (सर्व रा. कामरगाव, ता.नगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र लाळगे यांनी बबन कातोरे यांच्या घराशेजारी शौचालयाचा सेप्टिक टँक बांधण्यासाठी शनिवारी (दि.२) सायंकाळी जेसीबी ने खड्डा खोदला, या कारणावरून हा वाद झाला व या वादाचे रुपांतर पुढे हाणामारीत झाले.

पोलिसांनी दोन्ही गटाच्या ११ जणांवर गुन्हे दाखल केले असून पुढील तपास पो. हे.कॉ. के.एस शिंदे हे करत आहेत.

# भाजपाचे पदाधिकारी निस्वार्थ, निरपेक्षपणे, सचोटी व प्रामाणिकपणे उमेदवार संग्राम जगतापांच्या मागे उभे

### ॲड. अभय आगरकर यांचे प्रतिपादन





विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित शहर भाजपच्या बैठकीत शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांचा सत्कार करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील रामदासी, महेंद्र गंधे, प्रा.भानुदास बेरड, विवेक नाईक, प्रशांत मुथा, अनिल मोहिते, बाबासाहेब वाकळे, महेश नामदे आदी.

नगर – राज्यात तीन पक्षांची महायुती झाल्यावर नगर शहरातील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरची ही पहिलीच बैठक आहे. भाजपचे काही ध्येयधोरणे आहेत. त्यानुसारच काम करून निर्णय घेण्यात येतात. त्यानुसार आजपासून महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना शहर भाजपचे अधिकृतरीत्या समर्थन देण्यात येत आहे. सर्व पदाधिकाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीत निस्वार्थ, निरपेक्षपणे, सचोटी व प्रामाणिकपणे काम करून उमेदवार आ.जगतापांच्या मागे उभे राहून त्यांच्या विजयासाठी योगदान द्यावे. महायुतीमधील घटक पक्षांना बरोबर घेत कोणत्याही प्रकारचा संभ्रम व किल्मिष न ठेवता जास्तीत जास्त प्रचार व काम करू, असे प्रतिपादन शहर भाजपचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या रणधुमाळीत महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारात सक्रिय होण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी झालेल्या बैठकीत जाहीर केला. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अभय आगरकर यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रचारात सक्रिय होण्याच्या सूचना केल्या. यावेळी सुनील रामदासी, विधानसभा निवडणूक प्रमुख व महायुतीचे समन्वयक महेंद्र गंधे, प्रा.भानुदास बेरड, शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सरचिटणीस महेश नामदे, प्रदेश सदस्या सुरेखा विद्ये, महिला आघाडी प्रमुख प्रिया जानवे, सविता कोटा, पंडित वाघमारे, बाळासाहेब भुजबळ, मयूर बोचूघोळ आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी पार्टीचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. भारत माता की जय..., जय श्रीराम..., भारतीय जनता पार्टीचा विजय असो..., अशा घोषणा देत बैठकीत उमेदवार आ.संग्राम जगताप यांचा सत्कार करून विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### माझ्या विजयात भाजपचा सिंहाचा वाटा असेल : संग्राम जगताप

यावेळी संग्राम जगताप म्हणाले, भारतीय जनता पार्टीने मला समर्थन देण्याचे जाहीर केल्याबद्दल मी अंत:करणातून आभार व्यक्त करतो. राज्यात पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार असून नगर जिल्ह्यातही सर्वत जास्त महायुतीचेच उमेदवार निवडून येतील यात शंका नाही. आता मतदानासाठी खूप कमी दिवस राहिले आहेत. या दिवसात सर्वांनी आपापले योगदान देऊन जास्तीत जास्त प्रचार करावा. माझ्या विजयात मोठा सिंहाचा वाटा भाजपचा असेल. या निवडणुकीत काही मंडळी मुद्दाम अपप्रचार करत संभ्रम निर्माण करत आहेत. त्यांच्या अफवांना बळी न पडता नागरिकांमध्ये जागृती करा. भाजप हा राष्ट्रवादी काँग्रेसचा मोठा भाऊ आहे. या निवडणुकीत भाजपने मोठ्या भावाप्रमाणे मदत करावी. मीही छोट्या भावा सारखा तुमच्या बरोबर राहील. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येण्यासाठी मला पुन्हा संधी द्यावी.

यावेळी प्रा.भानुदास बेरड, सुनील रामदासी, अनिल मोहिते आदींनी विविध सूचना करत मनोगत व्यक्त केले. बैठकीचे प्रास्ताविक सरचिटणीस सचिन पारखी यांनी केले. प्रशांत मुथा व महेश नामदे यांनी सूत्रसंचालन केले. सविता कोटा यांनी आभार मानले.

# ओबीसींच्या अस्तित्वासाठी उमेदवारी अर्ज कायम ठेवला



मंगल भुजबळ

नगर – काँग्रेसच्या मंगल भुजबळ यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवत नगर शहरातील विकासासाठी व महिलांच्या अस्तित्वासाठी तसेच ओबीसींच्या हक्कासाठी ही लढाई लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात एकही ओबीसी उमेदवार महाविकास आघाडीने दिलेला नसल्याने तसेच काँग्रेस पक्षाकडून आपल्याला उमेदवारी मागे घ्या असा कोणताही आदेश किंवा निरोप आला नसल्याने आपण निवडणुकीच्या रिंगणात राहिल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे. सध्या मंगल भुजबळ या अपक्ष उमेदवार असून त्यांचा अनुक्रमांक १२ आहे व त्यांना शिट्टी हे चिन्ह निवडणूक आयोगाने दिले असून यावेळी शिट्टी घुमेल परिवर्तनाची ही साद त्यांनी नगरकरांना घातली आहे.

जुनी पेन्शन योजना मिळावी, सुशिक्षित बेरोजगार यांच्या हाताला काम मिळावे, महिलांना स्वतःच्या पायावर उभ राहता येईल असा स्वयंरोजगार मिळावा. नगर शहर हे विकसित शहर म्हणून ओळखले जावे, नागरिकांना आरोग्य सुविधा, पाणी, लाईट, रस्ते या सुविधा उत्तम दर्जाच्या मिळाव्यात तसेच एमआडीसी मध्ये विविध प्रकल्प राबवून तरुणी,तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा असे अनेक प्रश्न घेऊन आपण जनतेसमोर जाणार असून आपण नगर शहराची विधानसभा लढवीणारी पहिलीच महिला असल्याने एक महिला केवळ जनतेच्या हितासाठी जर निवडणूक लढवत असेल तर तिला साथ देणं हे मतदार असलेल्या नागरिकांचे सुद्धा कर्तव्य आहे त्यामुळे आपली लढाई ही फक्त आणि फक्त जनतेच्या हितासाठी असल्याने जनता मला नक्कीच साथ देऊन यावेळी नक्कीच परिवर्तन घडवून आणेल व ही आपली सर्वांची हक्काची ताई सर्वांच्या आशीर्वादाने नक्कीच आमदार बनेल असा मला विश्वास असल्याचे मंगल भुजबळ यांनी म्हटले आहे.

## डॉ. पोपटलाल गुंदेचा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सावेडीतील प्रोफेसर कॉलनी येथील रहिवासी डॉ. पोपटलाल गुंदेचा (डॉ. पी. टी.) (वय ८१) यांचे ६ नोव्हेंबरला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ३ भाऊ, भाऊजया, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कुशल कन्स्ट्रक्शनचे संचालक महेश व जयेश गुंदेचा यांचे ते वडील तर मनसुखलाल, प्रकाश, ईश्वर गुंदेचा (मिरीवाला) यांचे ते बंधू होत.

## दत्तात्रय पाठक यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चितळे रोडवरील रहिवासी दत्तात्रय धोंडिराम पाठक (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.

त्यांच्या मागे दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नात असा परिवार आहे. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

## रघुनाथ पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवासी रघुनाथ गोविंद पवार (रघुनाना, वय ७२) यांचे ६ नोव्हेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे व्हा.चेअरमन राजेंद्र तसेच संदीप पवार यांचे ते वडील होत.

## शंकरराव लाड (लोहार कारागिर) यांचे निधन



नगर – देडगाव (ता.नेवासा) येथील कुशल लोहार कारागिर शंकरराव बाबुराव लाड (वय ७५) यांचे १ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगरमधील महसूल अधिकारी राजेंद्र लाड व प्राथमिक शिक्षक संजय लाड यांचे ते वडील होत.

## श्रीमती संजीवनी बांबरसे यांचे निधन



नगर – श्रीमती संजीवनी लक्ष्मण बांबरसे (वय ५६) यांचे ३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. त्या धार्मिक वृत्तीच्या व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

त्यांनी स्वाध्याय परिवाराच्या माध्यमातून अनेक माणसे जोडली. त्या डॉ. प्रसाद बांबरसे यांच्या मातुश्री आणि ऋषिकेश व आनंद बांबरसे यांच्या चुलती होत.

# प्रचारफेरीत अभिषेक कळमकर यांच्यासमोर नागरिकांनी वाचला 'प्रलंबित प्रश्नांचा पाढा'

नगर – नगर शहरातील सावेडी उपनगरात आयोजित प्रचार फेरीत अभिषेक कळमकर यांना नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. या फेरीत कळमकर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांची मते, अपेक्षा, व समस्या जाणून घेतल्या. या वेळी नागरिकांनी सावेडी भागातील विकासाच्या कामांचा अभाव, वाढती गुन्हेगारी, आणि मूलभूत सोयींचा अभाव याबाबत मनमोकळेपणाने चर्चा केली.

महिलांसाठी सुरक्षित व स्वतंत्र उद्याने, तसेच तरुणांसाठी क्रीडांगणांची गरज ही नागरिकांनी कळमकर यांच्यासमोर मांडली. सावेडी परिसरात खेळाच्या सुविधा नसल्यामुळे तरुणांना योग्य संधी मिळत नाही, असा आक्षेप घेत क्रीडांगणाच्या उभारणीची मागणी करण्यात आली. याबरोबरच महिलांसाठी विशिष्ट उद्याने उभारून त्यांना सुरक्षित व खुला वावर मिळावा अशीही मागणी झाली.

आरोग्याच्या संदर्भात, नागरिकांनी दिल्लीच्या धर्तीवर छोटे छोटे क्लिनिक उभारण्याचे सुचवले, ज्यामुळे प्राथमिक तपासणीसाठी कमी खर्चात आरोग्यसेवा उपलब्ध होईल. यामुळे स्थानिकांना आपल्या आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी बाहेर जाण्याची आवश्यकता कमी होईल, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

या फेरीत अनेक नागरिकांनी १० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विकासाच्या कामांवरही प्रश्न उपस्थित केले. सावेडीत विकासकामे नाहीत, गुन्हेगारी वाढली आहे, आणि मुलभूत सुविधांचा अभाव आहे, असे नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले. वाढती गुन्हेगारी आणि विकासाच्या कामांच्या दिरंगाईमुळे परिसरातील रहिवासी अस्वस्थ आहेत, असे नागरिकांनी यावेळी बोलून दाखवले.

कळमकर यांनी सर्वांच्या समस्या लक्षपूर्वक ऐकून घेत त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. या प्रचार फेरीत त्यांनी स्थानिकांच्या अडचणी आणि अपेक्षांना प्राधान्य देऊन विविध उपाययोजनांच्या संकल्पना मांडल्या.



प्रचार फेरीत अभिषेक कळमकर यांच्यासमोर सावेडीतील प्रलंबित प्रश्न मांडताना नागरिक.

# छाटले जरी पंख माझे, पुन्हा उडेन मी... अडवू शकेल मला, अजून अशी भिंत नाही

## विधानसभा निवडणुकीतून माघार घ्यावी लागल्यानंतर माजी महापौर संदीप कोतकर यांनी सोशल मीडियातून व्यक्त केल्या भावना

नगर – तांत्रिक अडचणींमुळे मला आगामी विधानसभा निवडणूक लढविता आली नाही. तसेच माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनाही काही तांत्रिक अडचणींमुळे निवडणुकीतून माघार घ्यावी लागल्याने आम्ही दोघेही नगरकरांच्या सेवेपासून वंचित राहिलो आहोत. परंतु नगरकरांनो कोतकर कुटुंबाचा पुढील काळ तुमच्या सेवेसाठीच असेल असे भावनाप्रधान मत माजी महापौर संदीप कोतकर यांनी सोशल मीडियातून व्यक्त केले आहे.

संदीप कोतकर यांनी आपल्या वक्तव्यात म्हटले आहे, की प्रिय नगरकरांनो, गेल्या महिनाभरात घडत असलेल्या राजकीय घडामोडींकडे आपले लक्ष आहेच. बऱ्याच राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक घडामोडी घडून आल्या. होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीतून एक सक्षम पर्याय नगरकरांना देण्याचं स्वप्न आम्ही पाहिलं. नगरकरांचा विकास हा कोतकर परिवाराचा नेहमीच अजेंडा राहिलेला आहे. त्यातून माझ्या उमेदवारीचा विचार पुढे आला. परंतु, त्यात येत असलेल्या काही तांत्रिक अडचणीमुळे ते शक्य झाले नाही. त्यावर कार्यकर्ते आणि वरिष्ठांच्या आग्रहाने माजी उपमहापौर सौ. सुवर्णा संदीप कोतकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. मोठ्या ताकदीने जिंकण्यासाठी आणि बदल घडविण्यासाठी लढण्याची तयारी सुरू केली होती. कार्यकर्ते, जिवाभावाचे मित्र, सहकारी ज्यांचे योगदान मी कधीच विसरू शकत नाही. माझा भाऊ सचिन (आबा) आणि माझे पूर्ण कुटुंब यांनी प्रचंड परिश्रम केले. हे सगळं करीत असताना अनेक अडचणी येत होत्या. त्यांना तोंड देत जनसामान्यांच्या भेटीगाठी सुरू असताना काही तांत्रिक अडचणींमुळे सौ. सुवर्णा यांचाही उमेदवारी अर्ज मागे घ्यावा लागला.



ही माघार घेत असताना मनात एक निराशा आहे. परंतु हा शेवट नाही. ही सुरुवात आहे एक नव्या पर्वाची, गेली अनेक वर्षे वनवासात राहिलेले कोतकर कुटुंब पुन्हा जनसामान्यांच्या सेवेत येण्याची. इथून मागचा काळ तुमच्या साठीच होता. इथून पुढचा काळही तुमच्या सेवेसाठीच असेल. आपली लढाई ही नगरकरांच्या विकासासाठी होती आणि राहील, ती संधी आपण आम्हाला देत रहाल ही खात्री आहे, असे संदीप कोतकर यांनी म्हटले आहे. छाटले जरी पंख माझे, पुन्हा उडेन मी... अडवू शकेल मला, अजून अशी भिंत नाही... या काव्य ओळीद्वारे त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या व सोबत आहोत, सोबत राहू असे फेसबूक पोस्टमध्ये म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### किडनीस्टोनवर द्राक्षे खाणे लाभदायक

किडनीस्टोनवर द्राक्षांचे सेवन करणे उपयुक्त ठरते. द्राक्षात अलबुमीन आणि सोडिअम क्लोराइड यांचे प्रमाण खूप कमी असते.

त्यामुळे किडनी स्टोन आजाराने ग्रस्त असलेल्यांनी फळांमध्ये द्राक्षांना प्रधान्य द्यावे.

## पाककला

### नाशिकचा चिवडा

**साहित्य :** अर्धा किलो भाजके पोहे, अर्धा कप डाळ, खोबऱ्याचे काप, १ कप शेंगदाणे, स्लाइस करून उन्हात वाळवलेला कांदा, अर्धा कप काळा मसाला, २ चमचे तिखट, मीठ, ७-८ आमसुलं, धने-जिरे पूड, पिठी साखर, बारीक चिरलेला लसूण, २ चमचे आल्याचा कीस, २ चमचे तेल, फोडणीचे साहित्य.

**कृती :** तेल तापवून, कांदा लालसर तळून घ्या. दाणे, डाळ, खोबरं तळून घ्या. आमसुलं कुरकुरीत तळा. आलं, लसूण तळा. (आमसुलं, आलं, लसूण वाटून घ्या.) फोडणी बनवून त्यात आमसूल इ. वाटलेला मसाला परता.

## सौंदर्य

### चेहऱ्यावरील सुरकुत्या घालविण्यासाठी

पपई-चेहऱ्यावर सुरकुत्या दिसत असतील तर पपईचा गर काढून चेहऱ्यावर लावा. हळूहळू सुरकुत्या नाहीशा होतील.

## सल्ला

* आले स्वच्छ करून फ्रिजरमध्ये ठेवल्यास अधिक काळ टिकते. तसेच सहज चिरता व किसता येते.

* सर्दी-पडसे झाल्यास मोहरी पूड थोडी मध घालून चाटावे. लवंगतेल हुंगावे.

## वास्तू

* झोपण्याच्या खोलीत नेहमी सुंदर, कलात्मक व हसणाऱ्या बाळाची प्रतिमा लावा.

* जेवणाच्या खोलीचा रंग शांत आणि शीतलता प्रदान करणारा असावा.

* च्युइंगम चावल्याने मानसिक क्षमतेत पन्नास टक्के इतका फायदा होऊ शकतो. याने आपला हार्ट रेट वाढतो आणि या कारणाने रक्ताचा असरही वाढतो. यामुळे मेंदूतील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. यामुळे स्मरणशक्तीमध्ये अधिक फायदा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ७ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.षा. ११।४७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष :** पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ :** नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन :** विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क :** मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह :** आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर कराल. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या :** स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ :** देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा.

**वृश्चिक :** शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु :** आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.

**मकर :** उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ :** हितशत्रूंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून संभवतात.

**मीन :** आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. वाहने सावकाश चालवावीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आज गण्याने कमालच केली पुन्हा बँकेत जाऊन झोपला
कारण तिथे लिहिले होते की 'यहाँ सोने पर लोन मिलता है'

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* हॅलीचा धूमकेतू किती वर्षातून एकदा दिसतो? - ७६ वर्षांनी
* आर्य महिला समाज स्त्री सुधारणा कोणी स्थापन केली? - पंडीता रमाबाई
* भारतीय अर्थव्यवस्थेच्या कोणत्या क्षेत्रात छुपी बेरोजगारी आढळते? - कृषी
* हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते? - राजर्षी शाहू

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ■ | ४ | ५ |
| ६ | | ■ | ७ | ८ | ९ | | |
| | ■ | १० | | | | ■ | |
| ११ | | | ■ | १२ | | १३ | ■ |
| | ■ | १४ | १५ | | ■ | १६ | १७ |
| ■ | १८ | ■ | | ■ | १९ | | |
| २० | | | | ■ | | ■ | |
| २१ | | ■ | २२ | | ■ | २३ | |

**उभे शब्द :-** १) मागोमाग; लगोलग ४) लहान मुलाचा मुका ६) चाचणी; परीक्षा; सत्त्व ७) पाहुणचार; आदरातिथ्य १०) विकास करणारा ११) पक्का बांधलेला रस्ता १२) हंस १४) मुलगा (स्वत:चा); पुत्र १६) हस्त; कर १९) काळ्या तोंडाचा शेपूट असलेला एक प्राणी २०) घाई; त्वरा; धांदल २१) जखम वगैरेचा शरीरावर राहणारा डाग २२) समेट; सलोखा; साम २३) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट

**आडवे शब्द :-** १) देवांचा राजा; इंद्र २) पक्का; दृढ; भक्कम ३) खाद्यपदार्थाचा एखादा कण चुकून श्वासनलिकेत गेला असता येणारा जोराचा खोकला ४) एक द्रवरूप धातू ५) नोकर; चाकर; दास ८) रसाने भरलेले; रसाळ ९) एक प्राणी; अज; बोकड १०) खरेदी केलेले १३) छोटा; लघू; सान १५) नव्याने आलेला १७) भाजीपाला (हिंदी) १८) घरासमोरील मोकळी जागा १९) वाणी; जीभ; जिव्हा २०) अंगावरील बारीक केस; रोम

### शब्दगंध क्र. ७०४३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ड | क | स | ख्या | ह | री | ■ |
| मा | र | वा | ड | ■ | वा | स | ना |
| न | ■ | ■ | पा | ठ | ■ | ■ | य |
| शी | ल | वं | त | ■ | जा | च | क |
| ल | ■ | ग | ळ | ■ | स्त | र | ■ |
| ■ | आ | ण | ■ | जू | ■ | म | जा |
| पा | य | ■ | आ | ■ | ग | री | ब |
| स | त | ल | ज | ■ | वा | त | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** ज्यांच्याकडून काही आशा नाही बहुतेकदा तेच लोक चमत्कार करतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## घरात नकारात्मक ऊर्जा आहे हे कसे ओळखावे?

नकारात्मक ऊर्जा ओळखण्याचे काही मुख्य परिमाण आहेत त्या परिमाणात जर तुमचं घर बसत असेल तर समजावं की आपल्या घरात नकारात्मक ऊर्जा वास करीर आहे.

यातही दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऊर्जा ही सकारात्मक असो वा नकारात्मक या पृथ्वी च्या सर्व कोनात फिरत असते. (आता पृथ्वीचा कोन शोधू नका म्हणजे झालं =) गंमतीचा भाग सोडला तर ऊर्जा ही अनुभव करण्याची गोष्ट आहे त्यामुळे ती अनुभवानेच कळते की ती कशी आहे. म्हणून सर्व प्रथम आपण आपल्या राहत्या घराचा किंवा जागेचा थोडा अनुभव घ्यावा.

सर्वप्रथम लक्ष देण्या सारखी गोष्ट ही आहे की आपण आपली वास्तू नवीन घेणार असाल तर घेण्या आधी, जर मानव वस्तीतील घर किंवा फ्लॅट घ्यायचा असेल तर ती जागा कोणाची होती, म्हणजेच ज्या मालकाची जागा होती त्या जागेवर कोणाचा आकस्मिक किंवा अपघाती मृत्यू तर झाला नाही ना ही विचारपूस करावी नसेल तर उत्तम.

त्यानंतर जर ती जागा मानव वस्ती पासून दूर असेल तर तेथे कोणते स्मशान, दहन, दफनभूमी तर नव्हती ना हे बघावे असे असेल तर ती जागा घेऊ नये किंवा जवळपास देखील असली जागा असल्यास त्या जागे जवळील घर/जागा/फ्लॅट घेऊ नये.

आता जर तुम्ही घर/जागा/फ्लॅट चौकशी न करता घेतलाच असेल आणि राहण्या शिवाय पर्याय नसेल तर मग पुढील बाबींकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे.

ज्या घरात तुम्ही राहता त्या घरात तुम्हाला विनाकारण चिडचिड होते कां? काहीही कारण नसतांना देखील घरात वादावादी भांडण होतात का? घरात आल्या नंतर फ्रेश न वाटता मरगळ वाटते कां? आता आनंदी होतो अचानक दुःख व्हायला लागतं किंवा रडावंस वाटायला लागतं. घरात लहान मूल असेल तर ते सतत दचकून उठतं कां? लहान मूल झोपेत रडायला लागतं कां? मूल एकटक एकाच दिशेकडे बघून जवळ कोणीही नसताना वारंवार रडत किंवा हसत राहतो कां? आपल्याला आणि घरच्या लोकांना आपल्या अवती भोवती कुणी तरी आहे अशी सतत जाणीव, भास किंवा भीती निर्माण होते कां ?? (अर्थात जर कोणाला मानसिक त्रास नसेल तर.) सतत घर उगाच अस्तव्यस्त होतं कां ?? घरात रोजची पूजा करण्याची इच्छा होत नाही ?? अथवा कोणत्याही प्रकारच्या पूजा होत असतांना घरात कोणी न कोणी उगाच पूजा करण्या वरून भांडण, चिडचिड करत असल्यास. आणि हो एक अजून महत्वाचं लक्षण म्हणजे त्या घरात तुळस जास्त दिवस जगत नाही. सुकते किंवा जाळून जाते. ही आणि अश्या प्रकारची कारणं असतात ज्याने आपलं घर नकारात्मक शक्ती ने भरलेलं आहे असे लक्षात येतं.

घरात रोज सकाळ संध्याकाळ पूजा व्हावी. घरात उदबत्ती न जाळता गुग्गुळ राळ चा धूप दाखववावा. रोज सायंकाळी देवा जवळ दिवा लावल्या नंतर हनुमान चालीसा चा सात वेळा मोठ्या स्वरात पाठ करावा. घरात जसे जमेल तसे वार्षिक श्राद्धादिक कर्म करीत जावे. इतरही जमेल त्या पूजा सातत्याने घरात होऊ देत रहाव्या. एक महत्वाचा फायदेशीर उपाय सुद्धा देत आहे - रोज सकाळी आंघोळ केल्या नंतर स्वयंपाक बनविताना जो भात बनविला असेल त्यातून थोडा भात कोणालाही खाऊ देण्या आधीच काढून ठेवावा. सायंकाळी देवा जवळ दिवे लावण्या आधी तो भात एका एखाद्या झाडाच्या पानावर (उपलब्ध न झाल्यास कागदावर) काढून त्यावर थोडं दही घाला. हा भात संपूर्ण घरात फिरवून घरा बाहेर (रस्त्यावर) नेऊन टाकावा. असे रोज करावे. कधी जर नाही जमले किंवा रोजच जमत नसेल तर कमीत कमी अमावस्या तसेच पौर्णिमेला तरी नक्की करावे.

## समर्थ आणि कंजूष म्हातारी

समर्थ रामदास नेहमी या गावातून त्या गावात भ्रमण करत असत. असेच ते एकदा मावळ प्रांतात भ्रमण करत होते. त्यांनी काही दिवस एका गावात राहण्याचे ठरवले. त्या गावात समर्थ रामदास स्वामी एकेका आळीमध्ये जाऊन पाच घरांत भिक्षा मागत असत. एका गावात कोणीतरी सांगितले कि एक म्हातारी एकटी रहाते. ती कधीच कोणाला काही देत नाही. घरी गडगंज धन आहे पण कुणाला कधी काही मदतही करत नाही.

समर्थ त्या घरासमोर गेले व भिक्षा मागितली. ती म्हातारी घरातूनच ओरडली कि मी काही देणार नाही. माझ्याकडे देण्याजोगे काही नाही. तरी समर्थांनी प्रयत्न सोडला नाही. ते म्हणाले, तुझ्याकडे जे काही आहे ते तू दे मला त्याचे वाईट वाटणार नाही. आता त्या म्हातारीला खूप राग आला. ती पुढे आली व अंगणातली मूठभर माती तिने समर्थांच्या झोळीत टाकली. समर्थांनी आशीर्वाद दिला व ते पुढे गेले.

असे ३-४ दिवस झाले. तेव्हा त्या म्हातारीने त्यांना विचारले, मी झोळीत माती टाकली तरी तुम्हाला राग येत नाही? काय करता तुम्ही या मातीचे? तेव्हा समर्थ तिला म्हणाले, तुझ्याकडे देण्याजोगे खूप आहे पण तुझ्याजवळ दानत नाही. कमीत कमी माती तरी देण्याची सवय तुझ्या हाताला लागू दे. ती लागली तर अजूनही बरेच काही तू देऊ शकशील.

**तात्पर्य :** सत्कार्यासाठी दान देणे हा एक संस्कार आहे. तो संस्कार रुजला तर आपल्या जवळची प्रत्येक चांगली गोष्ट समाजाला द्यायची इच्छा होते. पण समाजकार्यासाठी वेळ द्यायची एकदा सवय लागली कि त्यातून समाजकार्यासाठी आपले सगळे जीवन समर्पित करणारे कार्यकर्ते तयार होतात.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



धरती पर अपने अस्तित्व के दौरान हम अपने-अपने कर्मों द्वारा निश्चित समय और मार्ग पर चलकर बने हुए आम ढाँचे में रहते हुए कर्म करके अपना भाग्य आप बनाते हैं। यह खण्ड (स्थूल संसार) एक बहुत बड़ा लेखा गृह या शुद्धि गृह है जहाँ हर एक को अपने जन्म- जन्मों का हिसाब चुकता करना पड़ता है और ऐसा करते हुए इच्छा या अनिच्छा से नये खाते खोलकर कर्मों के नये भण्डार (कोष) में जमा करवा लेते हैं, नये ऋण चढ़ा लेते हैं और जिन्हें फिर आने वाले लम्बे समय तक अनजाने में भुगतान करते हैं और हिसाब करते हैं। इस तरह बोये पीछे कर्मों की फसल को काटते समय, हर समय असमय नये अच्छे, बुरे और

### मृत्यू के पश्चात क्या?

पता नहीं किस-किस तरह के बीज बीजने के लिये नई जमीन तैयार करते रहते हैं और ऐसा सब हम मन और इन्द्रियों द्वारा प्रेरित होकर बिना सोचे समझे करते हैं।

महात्मा इस धरती को कर्म क्षेत्र कहते हैं क्योंकि यहाँ सारा समय बोने और काटने की प्रक्रिया चलती है धर्मराज की निगरानी, आदेश और नियंत्रण में, जो हर छोटे से छोटे और मामूली नज़र आते विचार, कर्म और वचन को न्यायपूर्ण ढंग से तोलता, परखता और जीवन के अन्त में इसका न्याय करता है। गुरु नानक साहब इसे धर्म खण्ड कहते हैं क्योंकि इस खण्ड में आई हर यात्री आत्मा को जैसा बीजै सो लुणै के सिद्धान्त जो हर किसी को बिना किसी विशेष छूट और बख्शिश से चलाता है, के अस्तित्व को पूरी तरह स्वीकार करना पड़ता है। हर एक को उसके अपने किये कर्मों के अनुसार तोला जाता है और कभी- कभी यह जीव बड़ी कठोर चोटें खाकर, त्रिलोकीनाथ ब्रह्म का पाठ (ज्ञान) सीखता है। स्थूल (पिण्ड), सूक्ष्म (अण्ड) और कारण (ब्रह्माण्ड) सारे मन के ही तीन अंग है जिनमें अनेक मण्डल, उपमण्डल, नर्क- स्वर्ग, अपनी बीच की अवस्थाओं सहित स्थित हैं जो मनुष्य अपनी ही एक या दूसरी इच्छाओं से पैदा हुई इन्द्रियाँ, सूक्ष्म बुद्धियाँ और प्रभाव ग्रहण करने की योग्यताएँ, पसन्द और नापसन्द, प्यार और घृणा, सम्मान और पक्षपात द्वारा पैदा करता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

जरूरी भी नहीं है। इसे फिर कभी कर दूंगा। पहले नया काम जो बहुत जरूरी है उसे कर लूं। दोनो में तनातनी शुरू हो गई। ना पुराना काम हुआ ना नया काम शुरू हुआ। आपसी सम्बन्ध बिगड़ गये और विवाद बढ़ गये। कुछ लोग काम की सम्भावना से गली छोड़ देते हैं। कुछ लोग इसलिए बाहर अपना समय बिता रहे होते हैं क्योंकि समय घर जाने से घर के कामो में हाथ बंटाना पड सकता है। कुछ कर्मचारी बिना मतलब छुटी लेते रहते हैं क्यो कि उस दिन काम ज्यादा होता है उस से बचा जा सके। कामचोर मानसिकता वाले लोग अपने निजी कामो में लगे रहते हैं और अपनी ड्यूटी के कार्य नहीं करते। कुछ लोग अपने मां बाप को पर्याप्त समय नहीं देते। आगे चल कर उनके बच्चे उन्हें समय नहीं देते।

बच्चे जो सीखते हैं वही तो करते हैं। कछ भगोड़े और कामचोरों का कार्य भी हमें करना पड़ता है। लाभ के समय कामचोर हाजिर रहते हैं। बोस ऐसे लोगों को दंडित नहीं करते तो हमें बहुत क्रोध आता है। फिर भी हमें उसका कार्य करना पड़ता

### अंतरीक बल

है जिस से हमारा समय उनके कामो में नष्ट होता है। दुनिया में सब कुछ हमारी मर्जी से नहीं होता। आप ने काम की योजना बना ली परंतु बच्चा बीमार हो गया। वह अभी ठीक ही नहीं हुआ कि दादा स्वर्गवास हो गया। अभी हम इस दुःख से उबरे ही नहीं थे कि दफ्तर में काम का दबाव आ गया। ऐसे ही कभी एक व्यक्ति कभी दूसरा हमें अपसेट कर देता है। हमें लड़ाई झगड़े के लिये उकसाया जाता है। कभी बड़े एन मौके पर सारा किया धरा चौपट कर देते हैं। ये लोग हमारे समय को खराब कर देते हैं। वैसे मूड और आंतरिक कारणों से भी समय की बहुत बर्बादी होती है। इन सब हालातों में आप को आगे बढ़ना है। केवल लगन काम कराती है। ऐसी परिस्थियों में भी सोचते रहा करो। क्या करू? आप को हल मिलता रहेगा। कुछ न कुछ पढ़ते रहा करो। छुप छुप कर पढ़ना है। पढ़ते पढ़ते सब समस्याओं से बाहर निकल जाएंगे। जब भी ऐसे हालातो से वास्ता पड़े तो अपने दिमाग को शक्तिशाली बनाने के लिये ज्यादा योग लगाना है और ज्यादा पढ़ना है। समय आप के अनुकूल हो जाएगा।

समय जब थम जाता है

समय कभी थमता नहीं, समय तो वही रहता है, बस हमारा नजरिया बदल जाता है। कुछ काम ऐसे होते हैं जिन्हें करते हुए हमें आनन्द आता है और समय का पता ही नहीं चलता। जब हम किसी मन पसंद व्यक्ति से स्नेह की बाते करते हैं तो समय का एक घंटा एक सेकेंड की तरह बीत जाता है। सुख में रहते हुये हमें अपने बीते जीवन का १०० साल ऐसे लगता है जैसे कल की बात हो, कल ही तो पैदा हुये थे और देखते ही देखते समय बीत गया। कोई नाच गाने का प्रोग्राम हो तो व्यक्ति कितना तालीन हो जाता है। कोई पढ़ने लिखने या मेहनत का काम हो तो व्यक्ति कितना कतराता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१२) ट्रिपल मार्कर (Triple Marker) : ही तपासणी गर्भावस्थेच्या सोळाव्या आठवड्यात म्हणजेच साधारणत: चार महिने झाल्यावर करतात. यामध्ये Bita HCG, lfa fito protein a serum estrodol यांचे प्रमाण बघितले जाते. हे प्रमाण जर कमी प्रमाणात आले तर गर्भावस्थेमध्ये धोका वाढु शकतो गर्भस्थ बाळाच्या मज्जा- रज्जू (Nerul Tube defect) दोष असु शकतो तसेच गर्भस्थ बाळाला Down's Syndrom हा आजार असण्याची शक्यता असते. ही तपासणी करण्यासाठी सोनोग्राफीचे रिपोर्ट सोबत असणे आवश्यक असते. (Congenital Scan) या तपासणीमध्ये जर बाळामध्ये गंभीर दोष आढळला तर वेळीच गर्भपात करुन घ्यावा कारण आयुष्यभर व्यंग असलेले बाळ सांभाळण्यापेक्षा गर्भपात करणे कधीही योग्य असते.

**१३) गर्भवतीचे लसीकरण :** धनुर्वाताचे लसीकरण

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

अनेक वेळा अंगणवाडी सेविका किंवा सरकारी कर्मचारी हे गर्भवतीला पहिल्या दोन महिन्यातच देतात, परंतु असे न देता योग्य वेळी म्हणजेच गर्भावस्थेच्या सहाव्या महिन्यात एक व त्यानंतर सातव्या महिन्यात दसरे असे नियमाने द्यावे.

आयुर्वेदामध्ये गर्भाची गर्भधारणेपासून ते प्रसूती पर्यंत मासानुमासिक वाढ व पोषण कशा पध्दतीने होते तसेच या काळामध्ये कोणती आयुर्वेदिक औषधे उपयोगी पडतात. या बद्दल सविस्तर वर्णन आढळते.

शुक्रशोणित जीवसंयोगे तु खलु कुक्षिगते गर्भसंज्ञा भवति।

**- चरक शरीरस्थान (४-६)**

जेव्हा गर्भाशयात स्त्रीबीजाची पुरुषबीजाशी जुळणी होऊन त्यामध्ये जीवात्म्याचा प्रवेश होतो, त्यालाच गर्भ असे म्हणतात.

**पहिला महिना:**

**प्रथमे मासि संमूर्च्छितः सर्वधातूकललिकृतः**
**खेटभुतो भवति ऽ व्यक्त विग्रहः सद्सद्भूताभावयवः ।**

- चरक शारीरस्थान (४-९)

**अर्थ :** या महिन्यामध्ये गर्भाची अवस्था बुडबुड्याप्रमाणे असते. गोलाकाराप्रमाणे आकार असतो. त्यात मृद् अवयवांची वाढ होण्यास सुरुवात होते. पहिल्या महिन्याच्या शेवटी गर्भ अर्धा इंच असतो. त्याचे वजन १ ग्रॅम असते.

**(क्रमश:)**

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००






लोकसंख्येच्या विस्फोटाला खतपाणी घालणाऱ्या चंद्राबाबू नायडू यांच्या प्रतिमेवर शेणलाडूचा मारा करण्यात आला.

# लोकसंख्येच्या विस्फोटाला खतपाणी घालणाऱ्या चंद्राबाबू नायडू यांच्या प्रतिमेवर शेणलाडूचा मारा

## राजमाता जिजाऊ दिवाळी पाडवा साजरा, लोकशाही बुकात लोककल्याणकारी योजनांच्या प्रस्तावची नोंद

नगर – शहरातील हुतात्मा स्मारकामध्ये पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने राजमाता जिजाऊ दिवाळी पाडवा साजरा करण्यात आला. प्रारंभी राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करुन लोकशाही बुकची पूजा करुन त्यामध्ये लोककल्याणकारी योजनांच्या प्रस्तावची नोंद करण्यात आली. देशासाठी घातक ठरत असलेल्या लोकसंख्येच्या विस्फोटाला खतपाणी घालणाऱ्या चंद्राबाबू नायडू यांच्या प्रतिमेवर शेणलाडूचा मारा करण्यात आला. तर या विधानसभा निवडणुकीत सत्तापेंढारी यांना पाडून चांगले उमेदवार निवडून देण्याचे आवाहन करण्यात आले.

दरवर्षी संघटनांच्या वतीने राजमाता दिवाळी पाडवा लोकाभिमूख कार्यक्रमाने साजरा केला जातो. यावर्षी लोककल्याणकारी योजनांचा प्रस्ताव लोकशाही बुकाच्या माध्यमातून सरकारपुढे मांडण्यात आला आहे. तर ही लोकशाही बुक निस्वार्थ भावनेने सामाजिक योगदान दिलेले दिवंगत उद्योजक स्व. रतन टाटा यांना समर्पित करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. जात, धर्म, पंथाच्या पलीकडे लोकशाही दिवाळीचे सूत्र कार्यकर्त्यांनी राबवले आहे. या कार्यक्रमात ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, वीर बहादूर प्रजापती, अशोक सब्बन, सुधीर भद्रे, जयेश देवळालीकर, बबलू खोसला, अशोक भोसले, रईस शेख, अशोक भोसले, दिलीप जाधव, पोपट भोसले, उल्हास जगधने, मोहसीन पठाण, अरुण खिची, समीना पठाण, दिलीप जाधव, कारभारी गायकवाड, मीराताई सरोदे, मालन मंझरी, रिता ससाणे, इमामबी शेख, आशाबाई सरोदे, आनंदा आढाव आदींसह संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

लोकशाही बुकामध्ये देशातील दोन कोटी घरकुल वंचितांना परवडणारी घरे देऊ शकणाऱ्या लॅण्ड व्हॅल्यू कॅप्चर तंत्राची नोंद करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांनी नऊ वर्षे सातत्याने डांगोरा पेटवलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये नगरच्या २० हजार नागरिकांची यादी अनेक वर्षे पडून आहे. परंतु त्यामध्ये एकाला देखील केंद्र किंवा राज्य सरकारला घर देता आले नाही, याची खंत देखील या लोकशाही बुकात नोंदविण्यात आली.

ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न सोडविण्यामध्ये भारत नक्कीच जगाचे नेतृत्व करू शकेल. त्यासाठी रेनगेन बॅटरी व ग्रीनगेन बॅटरी याचा आग्रहदेखील या लोकशाही बुकामध्ये नोंदविण्यात आला. निसर्गाने जमिनीच्या खालच्या मुरमाड किंवा सच्छिद्र खडकामध्ये पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था केली आहे. परंतु भारतात शेतीमशागतीबरोबर भूजल मुरविण्याची शेतकऱ्यांमध्ये आणि लोकांमध्ये आवड नसल्यामुळे सर्वत्र शेतीचे वाळवंट होत असल्याची नोंदही यावेळी करण्यात आली.

एकात्मिक ज्ञान सिद्धांतातून संपूर्ण मानव जातीचे कल्याण होऊ शकते. जात, धर्म, पंथ मानवनिर्मित बाबी या सिद्धांतामुळे नष्ट होणार आहे. कालच्यापेक्षा आजचा माणूस अधिक उन्नत चेतनेचा नक्कीच होऊ शकेल. त्यातून सर्व सजीवांबरोबर मानव जातीचे कल्याण देखील होणार आहे. विज्ञान, तत्त्वज्ञान, सायन्स, कॉन्टम फिजिक्स, तर्कशास्त्र, गणित या सर्व वैज्ञानिक बाबींपेक्षाही श्रेष्ठ असा असलेला एकात्मिक ज्ञान सिद्धांत आहे. परंतु जगातील किंवा भारतातील कोणत्याही विद्यापीठात या सिद्धांताचा गंध देखील शैक्षणिक तज्ञांना नाही. विश्वामध्ये चेतना ही अभौतिक तर ऊर्जा या भौतिक बाबी असून, त्यांच्या एकात्मिक द्वैत कार्यातून हा सिद्धांत विकसित झाला आहे. त्यामुळे यापुढे अध्यात्म आणि विज्ञान यांचा संकर यातून नक्की बदल घडू शकेल याची नोंद लोकशाही बुकात नोंद करण्यात आली असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

प्रकाश थोरात म्हणाले की, लोकसंख्येचा विस्फोट ही देशापुढे गंभीर प्रश्न असून, यामुळे देशाच्या विकासाला मर्यादा येत आहे. मात्र देशातील मोठे नेते असलेले चंद्रबाबू नायडू यांनी लोकसंख्या वाढविण्यासाठी केलेले वक्तव्य देशासाठी घातक आहे. त्यांनी लोकांनी जादा अपत्यांना जन्म द्यावा, असा आग्रह धरून भारतातील झोपडपट्ट्या, गुन्हेगारी, बेरोजगारी, निवाऱ्याचा अभाव याला अप्रत्यक्षरीत्या चालना दिली असून, नेत्यांनी चूकीच्या गोष्टी बरळण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अशोक सब्बन यांनी सरकारने स्वत:चा अजेंडा राबवण्यापेक्षा जनतेच्या भावना व प्रश्न लक्षात घेऊन काम करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.

# विद्यार्थी दिन

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्ते ही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते, त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

या ऐतिहासिक दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

# केडगावचे मठाधिपती अशोक जाधव यांना विश्वसन्मान जीवन गौरव महासन्मान पुरस्कार

## मुरबाडच्या आंतरराष्ट्रीय विराट संत संमेलनामध्ये होणार सन्मान



नगर – केडगाव येथील श्रीमंत सद्गुरु शंकर शेठ महाराज मठाचे मठाधिपती अशोक (दादा) जाधव यांना विश्वसन्मान जीवन गौरव महासन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

श्री क्षेत्र संगमेश्वर, ता. मुरबाड (जि. ठाणे) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विराट संत संमेलनामध्ये जाधव यांना साधु, संत, महंत यांच्या उपस्थितीमध्ये पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

अशोक दादा जाधव यांच्या धार्मिक व अध्यात्म क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल घोडबंदरचे विकास दादा पाटील व नगरचे सागर घोलप यांनी शुभेच्छा दिल्या.

# बुथ हॉस्पिटलमध्ये नोव्हेंबर महिन्यात दर गुरुवार, शुक्रवार व शनिवार मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन

नगर– अनेक वर्षापासून रुग्णांची सेवा निस्वार्थीपणाने करत असलेल्या द साल्वेशन आर्मी इव्हॅन्जलिन पासून हॉस्पिटल मध्ये नोव्हेंबर महिन्यात दर गुरवार, शुक्रवार व शनिवार मोफत दंत विकार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

दंत विकार ही समस्या बहुतेकांना आहेत, महागडे उपचार सर्व साधारण लोकांना परवरडणारे नसल्यामुळे अनेक जन उपचार घेणे टाळतात यास्तव बूथ हॉस्पिटलने मध्ये मोफत दंत तपासणी शिबीर आयोजित केली आहे. सुसज्ज दंत यंत्रणा उपलब्ध असलेल्या बूथ हॉस्पिटलमध्ये तपासणी साठी आलेल्या रुग्णांकडून कोणतीही डॉक्टर तपासणी फी आकारली नाही.

या शिबिरामध्ये पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या डॉ. ममता कांबळे (दंतरोग चिकित्सक) (वेळ ९ ते ५) या वेळेत उपलब्ध असून तपासणी करणार असल्याची महिती बुथ हॉस्पिटल प्रशासक मेजर देवदान कळकुंबे यांनी दिली. तसेच आर्थोडॉन्टिस – डॉ राजलक्ष्मी राय, लहान लेकरांच्या दातांचे डॉक्टर डॉ. आशिष रवराळे, प्रॉस्थोडॉन्टिस डॉ. सुरोज दत्ता, एन्डोडॉन्टिस डॉ. पूजा गायकवाड, ओरल सर्जन डॉ. राहुल आनंद, ओरल मीडिसिन व रेडिओलोजिस्ट डॉ. अनुसुया बियाणी हे हि विशेष दंत चिकित्सक म्हणून उपचार करणार आहेत.

या शिबिरामध्ये दातांची तपासणी मोफत आहे व तसेच दातासंबंधी सुचवलेल्या प्रक्रिया अगदी अल्प दरात पुढील प्रमाणे आहेत. डिजिटल एक्सरे (Digital x-ray) १००/– रूट कॅनल फक्त (Root canal) १०००–२०००/– अल्ट्रासोनिक मशीनने दात साफ करणे (scaling) ४००/–, मेटल कॅप (Metal cap) ९००/–, सिरॅमिक कॅप (Ceramic cap) १४०० दातांची कवळी बसवणे (3 types of Dentures) ६०००, ९०००, १२०००/– दातांच्या रंगाचे सिमेंट भरणे (cement filing) १०० ते ४००/–, तसेच पुढे व मागे आलेले दात सरळ करणे, दात काढणे, लहान लेकरांच्या दातांवरील सर्व उपचार ही उपलब्ध आहे या शिबिराचा जास्तीत जस्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन बुथ हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे.

संपर्क : ०२४१ – २३४५०५९, ८७८८०४३९४३, ब्र. प्रविण साबळे ९२७००७०८४६ ब्र. अमित पठारे ८९७५३७२२५४.

# 'एक दिवस वंचितांसाठी' अंतर्गत दिवाळीनिमित्त फराळ वाटप

## पद्मशाली युवाशक्ती ट्रस्ट, व पद्मशाली महिला शक्ती यांचा उपक्रम



पद्मशाली युवाशक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती आयोजित वंचितांना दिवाळी फराळाचे वाटप करताना दिपक गुंडू, सागर बोगा, सुमित इप्पलपेल्ली, विद्या एकलदेवी आदी.

नगर – दिवाळी सण आहे मोठा, नाही आनंदाला तोटा या उक्तीप्रमाणे आंब्याची पाने, झेंडूची तोरणे, आकाशदिवे आणि आसमंत उजळून टाकणारे लक्ष लक्ष दीप, नवीन कपडचोपड खरेदी आणि सोबतीला लाडू, चकली, करंजी असा सुग्रास फराळ. असं असतांना आपण ज्या समाजात वावरतो तिथे काही कुटुंब असे आहेत की ज्यांच्या दोन वेळच्या जेवणाची ही भ्रांत आहे. अश्यां वंचित गरजू, वृद्ध दांपत्याची, निराधारांची दिवाळी गोड करण्यासाठी संस्थेच्या वतीने दरवर्षी फराळाचे वाटप केले जाते, या वर्षी १०३ कुटुंबा पर्यंत फराळाचे घरपोहोच वितरण करण्यात आले, असे अजय म्याना सांगितले. ते पद्मशाली युवाशक्ती, पद्मशाली महिला शक्ती, अहमदनगर यांच्या वतीने राबवलेल्या एक दिवस वंचितासाठी उपक्रमांतर्गत करण्यात आलेल्या दिवाळी फराळ वाटप प्रसंगी बोलत होते.

रोजच्या गुजराणीचा प्रश्न असणाऱ्यांनी हा आनंदोत्सव, हा सण कसा साजरा करायचा हा एक जटिल प्रश्न असायचा ही बाब लक्षात घेऊन पद्मशाली युवाशक्तीने गेल्या ९ वर्षांपासून दर वर्षी दिवाळीच्या दिवशी वंचित गरजू, वृध्द दांपत्याना, निराधाराना घरी जाऊन दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळ वाटपाचा हा उपक्रम हाती घेतला आहे, असे योगेश ताटी म्हणाले.

आपले घर लक्ष दिव्यांनी उजळून निघत असतांना शेजारच्या घरी अंधार ही भारतीय संस्कृतीला न शोभणारी गोष्ट, घासातील घास देण्याची संस्कृती आपली. सर्वांचीच दिवाळी गोड व्हावी, आनंदात जावी ही प्रामाणिक ईच्छा घेऊन २०१६ पासून अहमदनगर शहरातील विविध भागात संघटनेतील युवकांच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला जातो, असे सुमित इपलपेल्ली म्हणाले.

यावेळी दिपक गुंडू, सागर बोगा, सुमित इप्पलपेल्ली, श्रीनिवास इप्पलपेल्ली, योगेश म्याकल, योगेश ताटी, विराज म्याना, सागर मेहसुनी, सागर आरकल, वैभव कंदी, शुभम बोल्ली, संजय चिप्पा, नरेश कुरापाटी, वैभव कोटा, विद्या एकलदेवी आदी उपस्थित होते.

# श्रुती संगीत निकेतनच्यावतीने १० नोव्हेंबरला स्वरस्मृती मैफल




नगर – श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त संस्थेच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय गुलमोहोर रोड येथे पं.विजय देशपांडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ स्वरस्मृती या शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाच्या विशेष मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. मैफलीत पूर्वार्धात पं.विजय देशपांडे, पं.सुधाकर चव्हाण आणि पं.आनंद भाटे यांचे शिष्य अनिरुध्द धर्माधिकारी हे आपले गायन सादर करतील.

मैफलीच्या उत्तरार्धात पं.वसंतराव देशपांडे आणि पं.जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य, पुणे येथील गायक पं.विजय कोपरकर यांचे गायन होईल. पं.विजय देशपांडे हे डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि पं.जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य होते. सदर मैफलीला तबल्यावर विवेक भालेराव आणि शेखर दरवडे तर हार्मोनियमवर मकरंद खरवंडीकर साथसंगत करणार आहेत. या मैफलीसाठी ALCHEMYS चे तुषार अंबाडे, SD असोसिएट्सचे शुभंकर गटणे, श्री स्वामी समर्थ सेवा संस्था सावली सोसायटी आणि श्री सद्गुरु प्रतिष्ठान, यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. ही मैफल विनामूल्य असून सर्व रसिक, गुरुजन आणि विद्यार्थ्यांनी याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजक हेमंत धर्माधिकारी आणि श्रुती संगीत निकेतनच्या अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी केले आहे.



आदर्शगाव हिवरे बाजार येथे विशेष निवडणूक निरीक्षक राममोहन मिश्रा यांनी विकास कामांची पाहणी केली. त्यावेळी पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला आदी.

# आदर्शगाव हिवरे बाजार राष्ट्रनिर्माणाची प्रयोगशाळा

## राममोहन मिश्रा यांचे प्रतिपादन

नगर – विशेष निवडणूक निरीक्षक पदी अहिल्यानगरपदी नेमणूक झालेले राममोहन मिश्रा यांनी ३ नोव्हेंबर रोजी आदर्शगाव हिवरे बाजारला भेट दिली आणि संपूर्ण विकास कामांची पाहणी करून पद्मश्री पोपटराव पवार यांनी सविस्तर माहिती सांगितली. तसेच त्यांच्या हस्ते हिवरेबाजार येथे वृक्षारोपण करण्यात आले.

श्री. मिश्रा पुढे बोलताना म्हणाले, हिवरे बाजार येथे पंचायतीच्या पुढाकारातून व ग्रामसभेच्या पाठबळातून केलेल्या विकासकामांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गावातील दारद्रीय व स्थलांतर थांबले आणि पाणी, माती व पर्यावरणाचा विचार या गावात होतो आहे म्हणून हिवरे बाजार हि राष्ट्रनिर्माणाची प्रयोगशाळा आहे असे मत त्यांनी मांडले.

हिवरे बाजार येथे झालेल्या विकासकामाची यशोगाथा (Case Study) आय.आय.एम., आय.आय.टी., मसुरी प्रशिक्षण केंद्र याठिकाणी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी ठेवण्यास सांगितले. प्रशिक्षणातून काम समजते परंतु अंतरमनातील प्रेरणा महत्वाची असून ती मला हिवरे बाजारमध्ये मिळाली. सन २००७ हिवरे बाजारला प्रथम राष्ट्रीय जल पुरस्कार मिळाला तेव्हा ते जलसंपदा मंत्रालयाचे सचिव होते.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, संचालक मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन रफिक नाईकवडी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, नायब तहसीलदार अनिल तोरडमल, सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते, मेजर शिवाजी पालवे, सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन राम चत्तर, बाबासाहेब गुंजाळ, एस.टी.पादीर, रो. ना.पादीर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'रेणावीकर विद्या मंदिर शाळेतील' २००२-२००३ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात

## २१ वर्षानंतर भरली शाळा, बालपणीच्या जीवनात रममाण होऊन माजी विद्यार्थ्यांची धमाल



रेणावीकर विद्या मंदिरच्या २००२-०३ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळाव्यात धमाल करताना माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी.

नगर – सावेडी परिसरातील रेणावीकर विद्यामंदिर शाळेतील २००२ ते २००३ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता.

माजी विद्यार्थी एकत्र आणण्यासाठी व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून मित्र जोडले गेले सर्व मित्र–मैत्रिणी माजी विद्यार्थिनी यांनी येथे भेट देऊन स्नेह मेळाव्याचे प्रारंभ केले शाळेची शिस्त व झालेल्या शैक्षणिक संस्कारामुळे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. तसेच शाळेचे ऋण देखील व्यक्त केले लहानपणीचे मित्र मैत्रिणी २१ वर्षांनी एकत्र आले त्यामुळे सर्वांना आनंद झाला.

यावेळी या समितीचे अध्यक्ष अशोक मासाळ, मार्गदर्शक निखिल आरु, यांनी वेगवेगळ्या कमिटी नेमूण कमिटी मेम्बर निखिल लकारे, विकास कांडेकर, सुजाता शिंदे, पल्लवी दीकोंडा, अमोल चेमटे, विजय कोतकर, क्षितिजा होशीग, पल्लवी आघाव विघ्ने, अमोल कांडेकर यां मित्र–मैत्रिणींनी एकत्र येत आपल्या वर्गातील मित्र–मैत्रिणींचा स्नेह मेळावा घेण्याचे ठरवले व ९० मित्र–मैत्रिणी स्नेह मेळावासाठी एकत्र केले त्यासाठी खुप मेहनत यांनी घेतली व या शाळेतील अनेक विद्यार्थी आज भारतातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या चांगल्या पदावर कार्यरत आहे. धावपळीच्या जीवनात आपण खूप व्यस्त झालो आपले बालमित्र मागे राहिले एकदा शाळा संपली आणि सगळे पक्षी आकाशात उडून गेले ह्याच पक्षांना एकत्रित आणण्याची मुठ बांधली गेली व सगळे एका छताखाली आज २१ वर्षानंतर आले एकमेकांना भेटून आनंद झाले. व आपल्यातील लहानपणीचे काही मित्र–मैत्रिणी हे दिवंगत असलेले त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. व दरवर्षी असेच एकत्र येणार असल्याचा निर्धार व्यक्त केला व आपल सामाजिक दायित्व निभावण्यासाठी एकमेकांची मदत घेत अनेकांना आधार देण्यासाठी कायम तत्पर राहण्याचा संकल्प केला.

सूत्रसंचालन प्रियांका शेळके, बोबडे पाटील यांनी केले.

प्रास्ताविक पल्लवी दिकोंडा, निखिल लकारे यांनी, विकास कांडेकर, पल्लवी आघाव, विघ्ने यांनी सांभाळल्या. आभार अशोक मासाळ यांनी मानले.



डायट मार्फत नवनियुक्त शिक्षक सेवाप्रवेशोत्तर प्रेरणा कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. राजेश बनकर. समवेत व्यासपीठावर इतर मार्गदर्शक प्राध्यापक वर्ग.

# वर्गातील १०० टक्के विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पत्ती साध्य होणे गरजेचे

## डॉ. राजेश बनकर यांचे प्रतिपादन; डायट मार्फत नवनियुक्त शिक्षक सेवाप्रवेशोत्तर प्रेरण कार्यक्रम प्रशिक्षणास सुरुवात

नगर – देशाचे भवितव्य चार भिंतीच्या आत घडू शकते असे कोठारी आयोगात सांगितले आहे आणि ते नवनियुक्त शिक्षकांनी समजून घेणे गरजेचे आहे उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी नवनियुक्त शिक्षकांनी १० सूत्रांचा अवलंब करण्याबाबत सखोल मार्गदर्शन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर जिल्हा अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांनी केले.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर जिल्हा अहिल्यानगर व शिक्षण विभाग जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यात दोन ठिकाणी सुमारे २०० नवनियुक्त शिक्षकांसाठी सेवा प्रवेशोत्तर प्रेरण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे अध्यापक विद्यालय अहिल्यानगर व शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यापक विद्यालय संगमनेर येथे प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डायटचे प्राचार्य डॉ.राजेश बनकर हे होते तसेच वरिष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षण समन्वयक अरुण भांगरे यांनी नवनियुक्त शिक्षकांना मार्गदर्शन केले. सात दिवसात सुलभकांच्या माध्यमातून उत्कृष्ट असे सूक्ष्म प्रशिक्षण नियोजन केले आहे त्याचा फायदा विद्यार्थी केंद्रित शिक्षणासाठी होऊन एक चांगले विद्यार्थी घडवण्याचे काम व उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी प्रशिक्षणाचा फायदा प्रशिक्षणार्थींना होईल असे प्रतिपादन वरिष्ठ अधिव्याख्याता अरुण भांगरे यांनी केले.

प्रास्ताविक अधिव्याख्याता कैलास सदगीर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभक महेश पाडेकर यांनी तर आभार सुलभक संदीप वाकचौरे यांनी मानले.

यावेळी संगमनेर गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, विस्तार अधिकारी त्रिभुवन, तज्ञ सुलभक सविता कचरे, संदीप वाकचौरे, महेश पाडेकर, सदानंद डोंगरे, अनमोल होन, प्रकाश पारखे, सुनील घोलप उपस्थित होते.

# जागतिक कोडींग स्पर्धेत तेजस अडगटला प्रथम




नगर – नगरमधील तेजस अडगटला याने संगणकातील जागतिक कोडींग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तेजस याला संगणक, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, कोडींग या विषयाची अगदी लहानपणापासून प्रचंड आवड आहे. कोणत्याही इन्स्टिट्यूटमध्ये सहभागी न होता स्वतःच अभ्यास करून तेजस या क्षेत्रात कार्यरत आहे. यंदा तो दहावीत असून शालेय शिक्षणात देखील अत्यंत हुशार आहे.

नुकत्याच झालेल्या लिसेरिया या कोडींग स्पर्धेत तो सहभागी झाला होता. असोसिएशन फॉर कम्प्युटींग मशीनरी आणि वर्ल्ड डेव्हलपर्स ॲण्ड कोडर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठी कोडींग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जगातील साधारणपणे २५ कोटी युवक सहभागी होत असतात. त्यामध्ये साधारणपणे ११ कोटी युवक १८ वर्षांखालील वयोगटातील असतात. या भव्य जागतिक कोडींग स्पर्धेत तेजस १८ वर्षांखालील स्पर्धक म्हणून सहभागी होऊन ११ कोटी युवा स्पर्धांमधून प्रथम क्रमांक मिळवून यशस्वी झाला आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यासाठी संबंधित संस्थेने प्रमाणपत्र प्रदान केले आहे. या यशाची नोंद त्याला या क्षेत्रात करिअर करण्यासाठी अत्यंत महत्वाची ठरेल.

तेजस हा नाट्य व जाहिरात क्षेत्रातील मंदार सतीश अडगटला यांचा मुलगा व ज्येष्ठ आर्टिस्ट किरण पंडित यांचा नातू आहे. तो दिवंगत आर्टिस्ट स्व.नयना यांचा मुलगा आहे.

# राष्ट्रीय परीक्षेत नगर येथील डॉ. अर्चना सिंह तांबोळींचे यश



नगर –शहरातील डॉ.अर्चना सिंह तांबोळी यांना नुकतीच मुंबई येथे FHNO superspecialty अर्थात हेड अँड नेक कॅन्सर सर्जन (तोंडाच्या कर्करोग विशेषज्ञ) अशी डिग्री प्रदान करण्यात आली. या परीक्षेत संपूर्ण भारतात डॉ. अर्चना यांचा आठवा क्रमांक आला.

त्यांनी ३ वर्ष HCG Manavta cancer centre, Nashik येथे फेलोशिप पूर्ण केली. त्यांनी आपले संशोधन विविध परिषदा मध्ये मांडले आहे. आता लवकरच त्या नगरमध्ये आपली पूर्ण वेळ सेवा देणार आहेत.

तोंडाचे कॅन्सर होऊ नये म्हणून जन जागृती शिबिरे आयोजित करण्याचा त्यांचा मानस असून तोंडाचा कॅन्सर लवकर ओळखणे, मार लागलेल्या जबड्याचे व चेहऱ्याचे व्यवस्थापन, रुतलेला दात काढणे, डेंटल implants इत्यादी सुविधा त्या डॉ. तांबोळी हॉस्पिटल येथे सुरू करणार आहेत.

डॉ.अर्चना या Retina surgeon डॉ.क्षितिज तांबोळी यांच्या पत्नी असून डॉ.सुचित आणि सौ. नेहा तांबोळी यांच्या सून आहेत.

# ‘नाट्यपदाच्या नांदीच्या स्वरात’ ऐतिहासिक मोने कलामंदिराच्या रंगमंचावर नटराज पूजन

## नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेच्या वतीने मराठी रंगभूमीदिन उत्साहात साजरा



मराठी रंगभूमी दिनानिमित्त नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेच्या वतीने ऐतिहासिक मोने कला मंदिराच्या रंगमंचावर ज्येष्ठ संगीततज्ञ श्रीराम तांबोळी, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी.कुलकर्णी व शिरीष जोशी आदींच्या हस्ते कलादेवता नटराजाचे पूजन करण्यात आले.

नगर – मराठी रंगभूमी दिनानिमित्त पंचतुंड नररुंडमालधर... या नाट्यपदाच्या नांदीच्या स्वरात नाट्यदेवता नटराजाचे व घंटा पूजन शहरातील सर्वात जुन्या ऐतिहासिक मोने कला मंदिर या रंगमंचावर करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा.प्रसाद बेडेकर यांच्या संकल्पनेतून हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मधील ऐतिहासिक मोने कला मंदिराच्या रंगमंचावर पूर्वी ज्या कलावंतांनी आपली कला सादर केली अशा ज्येष्ठ कलावंतांच्या हस्ते हा नटराज पूजनाचा कार्यक्रम झाला. यावेळी ज्येष्ठ संगीततज्ञ श्रीराम तांबोळी, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी.कुलकर्णी व शिरीष जोशी आदींच्या हस्ते कलादेवता नटराजाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.यशवंत डांगे यांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी नगरमधील महानगरपालिकेच्या नाट्यसंकुलाचे काम लवकरच पुन्हा सुरु करत असून २०२५ मध्ये हे काम पूर्ण करू, असे आश्वासन दिले.

पी.डी.कुलकर्णी म्हणाले, नगरच्या मोने काला मंदिर या व्यासपीठाने अनेक कलाकार घडवले आहेत. येथे आल्यावर वय विसरून पुन्हा जुन्या दिवसांच्या आठवणीत रममाण होतो. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची १७५ वर्षाची वैभवशाली परंपरा आहे. अनेक या शाळेने अनेक विद्यार्थी, रंगकर्मी व खेळाडू घडवत नगर शहराला सांस्कृतिक नेतृत्व दिले आहे. अशा वैभवशाली परंपरा असलेल्या मोने कला मंदिराच्या रंगमंचावर नटराज पूजन करताना भरून आले आहे.

क्षितिज झावरे म्हणाले, नाटक हे रंगकर्मींची खरी ओळख आहे. मराठी रंगभूमी दिन साजरा करताना याचे आपण सक्रिय घटक असल्याचा अभिमान वाटतो. रंगभूमी अधिक सशक्त होण्यासाठी आपण सर्वांनी काम अधिक करावे. येणाऱ्या काळात प्रेक्षकांच्या समाधानासाठी जास्तीत जास्त नाटकांच्या प्रयोगाचे आयोजन करून करू.

प्रास्ताविकात प्रा.प्रसाद बेडेकर म्हणाले, फिरोदिया हायस्कूलच्या मोने कला मंदिराच्या व्यासपीठावर नगर शहरातील बहुतेक सर्वच रंगकर्मींनी काम केले आहे. हे व्यासपीठ जुन्या रंगकर्मींची जीवनदायी आहे. म्हणूनच मराठी रंगभूमी दिनानिमित्त नटराज पूजनाचा कार्यक्रम या व्यासपीठावर करून जुन्या आठवणींना उजळा मिळावा यासाठी हा उपक्रम राबवला आहे. नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेने व्यवसायिक नाटकांची योजना सुरु केली आहे. त्याचप्रमाणे प्रायोगिक नाटकांची शृंखला सुरू करण्याचा विचार करत आहोत.

कार्यक्रमाची सांगता अमृता बेडेकर यांच्या नाट्यपद गायनाने झाली. यावेळी रंगकर्मी अभय गोले, डॉ.प्रकाश कांकरिया, क्षितिज झावरे, जालिंदर शिंदे, अमित खताळ, नाना मोरे, गणेश लिमकर, विद्या जोशी. अमृता बेडेकर, डॉ. आशुतोष जोशी, शंतनु खानविलकर, कामोद खराडे, विक्रम जोशी, संजय दळवी आदी उपस्थित होते.





घर घर लंगरच्यावतीने रुग्णालयातील नातेवाईक, बांधकाम कामगार व रस्त्यावरील वंचितांची दिवाळी गोड करताना दिवा केला प्रज्वलित. दुसऱ्या छायाचित्रात रुग्णांच्या नातेवाईकांना फराळाचे वाटप करताना हरजितसिंग वधवा आदी.

# रुग्णालयातील नातेवाईक, बांधकाम कामगार व रस्त्यावरील वंचितांची दिवाळी झाली गोड

## घर घर लंगर सेवेने वंचितांच्या अंगणात आनंदाचा दिवा केला प्रज्वलीत, दिवाळी साजरी करुन फराळाच्या पाकिटांचे वाटप

नगर – शहरातील जिल्हा रुग्णालय, रस्त्याच्या कडेला विविध साहित्य विक्री करुन पालमध्ये राहणारे, रस्त्यावर उघड्यावरचे जीवन जगणारे व सार्वजनिक प्रकल्पांचे बांधकाम करणाऱ्यांच्या अंगणात दिवे प्रज्वलीत करुन घर घर लंगर सेवेच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली.

घरापासून लांब असलेल्या या दुर्बल घटकातील नागरिकांची दिवाळी गोड करण्याचे काम लंगर सेवेच्या सेवादारांनी केले. त्यांच्या सोबत फुलझड्यांची आतषबाजी करुन त्यांना दिवाळीच्या फराळाचे पाकिट वितरीत करण्यात आले. दिवाळीनिमित्त अनोळखी व्यक्तींकडून मिळालेल्या या अनोख्या भेटीने वंचित व कामगार वर्ग भारावले.

दिवाळी पाडव्याच्या दिवशी झालेल्या या उपक्रमात हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, मुन्ना जग्गी, राजा नारंग, सुनील थोरात, कैलाश नवलानी, डॉ. संजय असणानी, दिनेश चोपडा, सिमरजीतसिंग वधवा, मन्नू कुकरेजा आदी सहभागी झाले होते.

लंगर सेवेचे सेवेदार जिल्हा रुग्णालयात दाखल होऊन रुग्णांच्या नातेवाईकांना दिवाळी साजरी करण्यासाठी बाहेर येण्याचे आवाहन केले. तर रुग्णालयाबाहेर पणत्या प्रज्वलीत करुन सर्वांसाठी सदृढ आरोग्याची प्रार्थना करण्यात आली. घरापासून लांब असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसह फुलझड्या पेटवून त्यांना दिवाळीचे फराळ भेट देण्यात आले.

रस्त्यावर विविध व्यवसाय थाटून पालमध्ये राहणारे व रस्त्याच्या कडेला झोपणाऱ्या दुर्बल घटाकातील कुटुंबीयांच्या अंगणात तर बुरुडगाव रोड येथील मनपाच्या हॉस्पिटलचे काम करणाऱ्या कामगारांसह लंगर सेवेच्या माध्यमातून दिवाळी साजरी करुन त्यांना फराळाच्या पाकिटांची भेट देण्यात आली. वंचितांच्या झोपड्यात जाऊन आनंदाचा दिवा प्रज्वलीत करण्यात आला.

कोरोनाच्या संकटकाळात गरजू गोर–गरीब घटकातील भुकेलेल्यांना जेवण व इतर गरजूंना मदत पोहचविणाऱ्या घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून दरवर्षी वंचितांची दिवाळी आनंदमय व गोड केली जात आहे. दिवाळी हा आनंद वाटण्याचा सण असून, या भावनेने हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमासाठी जनक आहुजा, सतीश गंभीर, प्रशांत मुनोत, गुलशन कंत्रोड, राजू जग्गी, सनी वधवा, दलजीतसिंग वधवा, राहुल बजाज, अभिमन्यू नय्यर यांचे योगदान लाभले.

# जिल्हास्तरीय रोलिंग स्केटिंग स्पर्धेत श्रीनिधी गायकवाडला सिल्व्हर मेडल



भिंगार – येथील प्रियदर्शनी स्कूलमध्ये झालेल्या अहमदनगर जिल्हा रोलिंग स्केटिंग चॅम्पियनशिप २०२४ २०२५ स्पर्धेत टीम एस स्पोर्ट्स अकॅडमी स्केटिंग क्लासची श्रीनिधी संतोष गायकवाड हिने सिल्वर मेडल पटकावले. ती ९ ते ११ या वयोगटात खेळली ती अशोकभाऊ इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी आहे.

या स्पर्धेतून श्रीनिधी गायकवाड हिची महाराष्ट्र स्टेटला निवड झाली असून या स्पर्धा लवकरच मुंबईत होणार आहे. भिंगार येथे झालेल्या स्पर्धा अहमदनगर जिल्हा रोलिंग स्केटिंग संघटनेचे सचिव सतीश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाली तर प्रमोद डोंगरे आणि शुभम करपे सर या टीमच्या प्रशिक्षकांनी परिश्रम घेतले.

# संयुक्ता काळेला स्केटिंगचे जिल्हास्तरीय रौप्यपदक



नगर – भिंगार येथील प्रियदर्शनी पाब्लक स्कूलमध्ये झालेल्या अहमदनगर जिल्हा रोलर स्केटिंग चॅपीयनशीप २०२४–२५ स्पर्धेत टीम् एस् स्पोर्टस् ॲकॅडमी स्केटिंग क्लासची संयुक्ता सचिन काळे हिने रौप्यपदक पटकवले. ती ५ ते ७ या वयोगटात खेळली. ती आयकॉन पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी आहे.

या स्पर्धेतून संयुक्ता काळे हिची महाराष्ट्र स्टेटला निवड झाली असून ही या स्पर्धा लवकरच मुंबईत होणार आहेत.

भिंगार येथे झालेल्या स्पर्धा अहमदनगर जिल्हा रोलर स्केटिंग संघटनेचे सह सचिव सतीश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. तर प्रमोद डोंगरे आणि शुभम कर्पे यांनी या टीमचे प्रशिक्षकांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी बाळासाहेब साळवे यांची नियुक्ती



नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी– शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी येथील बाळासाहेब शंकर साळवे यांची निवड करण्यात आली आहे. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्तीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नुकतेच श्री. साळवे यांना दिले आहे.

श्री. साळवे यांनी आजवर दिलेले योगदान लक्षात घेऊन, तसेच पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरित्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी आणि ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल श्री. साळवे यांचे शरद पवार, जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, मधुकर कदम, संजय मगर, चेतन गव्हाणे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# एमआयडीसीमध्ये इंडियन व्हॅल्यू इंजिनिअरिंग सोसायटीच्या नगर चॅप्टरचे उद्घाटन

## अभियांत्रिकी, उत्पादन, बांधकाम, उद्योग, रुग्णालये आणि अनेक उद्योगांना चालना देण्याचा उपक्रम



एम.आय.डी.सी. मध्ये इंडियन व्हॅल्यू इंजिनिअरींग सोसायटीच्या नगर चॅप्टरचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना अरविंद पारगावकर, प्रसाद लेले आदी.

नगर – येथील एमआयडीसी, एमसीसीआयए मध्ये इंडियन व्हॅल्यू इंजिनिअरिंग सोसायटी (इनव्हेस्ट) अंतर्गत नगर चॅप्टरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्हॅल्यू इंजिनिअरिंगचा उपयोग अभियांत्रिकी, उत्पादन, बांधकाम, उद्योग, रुग्णालये आणि अनेक उद्योगांमध्ये उपयोगात आणण्यासाठी प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

अरविंद पारगावकर हे या चॅप्टरचे चेअरमन (एमेरिटस) असतील आणि लॉरिट्झ नुडसेन (एल ॲण्ड टी) चे लक्ष्मण पुजारी झोनल चेअरमन म्हणून काम करणार आहे. लॉरिट्झ नुडसेनचे प्रसाद लेले आणि सीजी पॉवरचे गौतम सुवर्णपत्की यांनी व्हाईस चेअरमनपद स्विकारले. व्ही डिझाईन आणि टूलिंगचे सनी वधवा हे झोनल सेक्रेटरी म्हणून आणि लॉरिट्झ नुडसेनचे विकास मालकर हे सहसचिव म्हणून काम पाहणार आहे.

लॉरिट्झ नुडसेन कडून केतन देशपांडे विभागीय कोषाध्यक्ष म्हणून, तर इंडिया व्हॅल्यू इंजिनिअरिंग सोसायटीचे सतींदरसिंग अहलुवालिया आणि राजन नागरे मार्गदर्शन करणार आहेत. सीजी पॉवर कडून संदीप बचकर, जीकेएनचे सुनील राठी आणि किर्लोस्करचे शंकर खाटेकर कौन्सिल सदस्य राहणार आहे.

इंडियन व्हॅल्यू इंजिनिअरिंग सोसायटी (इनव्हेस्ट) चे अध्यक्ष अमित कुमार यांनी वर्चुअल पध्दतीने कार्यक्रमात सहभाग नोंदवून अध्याय निर्मितीसाठी शुभेच्छा दिल्या. केएसबी, लॉरिट्झ नुडसेन, सीजी पॉवर, पॉलीमिक्ट, क्लग पंप, व्हिसाग्रल इंडस्ट्री, केसीपीजी, जीकेएन आणि एमआयडीसी मधील कंपन्यांचे अभियंते व्हॅल्यू इंजिनिअरिंग या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

व्हॅल्यू इंजिनिअरिंग ही एक संकल्पना असून, जी आवश्यक कार्ये शक्य तितक्या कमी खर्चात कव्हर करण्याच्या दृष्टिकोनाचा अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करते. ही संकल्पना कार्यप्रदर्शन किंवा कार्यक्षमतेशी तडजोड न करता साहित्य बदलण्यावर आणि कमी खर्चिक पर्याय निवडण्यावर भर देते. भौतिक गुणधर्मांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, प्राथमिक लक्ष सामग्री आणि घटकांची कार्ये ऑप्टिमाइझ करण्यावर आहे. मूल्य अभियांत्रिकी उत्पादन, बांधकाम, उद्योग, रुग्णालये आणि अनेक उद्योगांमध्ये लागू असल्याचे चर्चासत्रात स्पष्ट करण्यात आले.

या चर्चासत्रात मोठ्या संख्येने अभियंते सहभागी झाले होते. सतींदरसिंग अहलुवालिया यांनी व्हॅल्यू इंजिनीअरिंगची थोडक्यात ओळख करून दिली. अरविंद पारगावकर व लक्ष्मण पुजारी यांनी व्हॅल्यू इंजिनिअरिंगचे महत्त्व विशद करुन व्यक्त केली. प्रसाद लेले यांनी व्हॅल्यू इंजिनिअरिंगचा प्रवास आणि अनुभव सांगितला. सनी वधवा कार्यक्रमाचे मास्टर ऑफ सेरेमनी होते. या चॅप्टरद्वारे भविष्यात सेमिनार, प्रशिक्षण आदी प्रकल्प आयोजित केले जाणार आहे.



## मोगरा!

तप्त झळा सोसूनी
असा मोगरा फुलतो
सर्वदूर आसमंती
लोट सुगंधी वाहतो
इवलेसे शुभ्र फुल
परि दरवळ दिव्य
एक एका फुलापाशी
जणू उमलते काव्य



भर उन्हाळ्यात अशा ठिकाणी जायला कोणाला आवडणार नाही बरं!

# कॅलिडोस्कोप

## 'जय श्रीराम' न म्हणणाऱ्या शिक्षकाशी असभ्य वर्तन




गाझियाबादच्या क्रॉसिंग रिपब्लिक भागात उर्दू शिक्षकासोबत असभ्य वर्तनाचे प्रकरण समोर आले आहे. येथे शिक्षकाला 'जय श्रीराम' म्हणण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पीडितेने विरोध केल्यावर त्याला लिफ्टमधून ढकलण्यात आले. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला अटक करून तपास सुरू केला आहे. त्याचबरोबर 'सोशल मीडिया यूजर्स'नी या प्रकरणावर प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही संपूर्ण घटना 'पंचशील वेलिंग्टन सोसायटी ऑफ क्रॉसिंग रिपब्लिक'मध्ये घडली. मोहम्मद आलमगीर नावाचे उर्दू शिक्षक येथे शिकवण्यासाठी गेले होते. सोसायटीत शिकवणीसाठी गेल्याचे त्यांनी सांगितले, ते वेटिंग एरियामध्ये लिफ्टची वाट पाहत असताना मनोज कुमार नावाचा रहिवासी तेथे आला आणि त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आधी मनोज त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहू लागला. यानंतर तुम्ही कुठे जात आहात, अशी विचारणा केली. आलमगीरने सोसायटीच्या १६ व्या मजल्यावर अरबी शिकवणी शिकवण्यासाठी जात असल्याची माहिती देताच मनोजने 'जय श्री राम' म्हणण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. शिक्षकाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले; पण त्याने त्याला सोडले नाही आणि त्याला टोमणे मारायला सुरुवात केली.

शिक्षक म्हणाले, 'त्याची कृती पाहून मला आश्चर्य वाटले; पण मी काहीच बोललो नाही. पहिल्या मजल्यावर लिफ्ट थांबल्यावर त्याने मला ढकलून दिले. यानंतर त्यांनी दुसऱ्या रहिवाशांना विचारले, की या सोसायटीत मुस्लिम कधीपासून येऊ लागले? अन्य एका रहिवाशानेही गैरवर्तन केले पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिताने सांगितले, की लिफ्टमध्ये उपस्थित असलेल्या अन्य रहिवाशानेही त्याच्याशी गैरवर्तन केले आणि त्याला १६व्या मजल्यावर जाण्यापासून रोखले; मात्र, काही लोकांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून परिस्थितीचे कारण देत त्यांना तेथून निघून जाण्यास सांगितले. यानंतर आलमगीरने विद्यार्थ्यांच्या पालकांना फोन करून या प्रकरणाची माहिती दिली. यानंतर मनोजने पुन्हा एकदा 'जय श्री राम' म्हणण्यासाठी दबाव आणला. पीडितेच्या म्हणण्यानुसार, जेव्हा त्याने प्रतिसाद दिला नाही, तेव्हा इतर रहिवाशांनी त्याला तळमजल्यावर नेले आणि त्याच्याशी गैरवर्तन करण्यास सुरुवात केली. यानंतर सुरक्षारक्षक आणि इतर रहिवाशांनी शिक्षकाचा नंबर घेतला. तसेच, त्याला सोसायटी सोडण्यास सांगितले. या प्रकरणी मनोज कुमारविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. घटनेच्या वेळी मनोज मद्यधुंद अवस्थेत असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपीने सांगितले की, त्याने शिक्षकाला काही प्रश्न विचारले होते, ज्याचे त्याने उत्तर दिले नाही. यामुळे तो संतप्त झाला. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले, त्यानंतर त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली.

## 'बॉस'च्या माणुसकीहीन उत्तरामुळे ट्रोल!



पुण्यातील एका मल्टीनॅशनल कंपनीत कामाच्या दबावाखाली येऊन एका सीए टॉपरच्या आत्महत्येने खळबळ उडाली होती. कामाचा प्रचंड ताण असल्याने तिने मृत्यूला कवटाळले होते. त्यानंतर कर्मचाऱ्यावर कंपनीतील कामाचा प्रचंड ताण हा विषय पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

कॉर्पोरेट संस्थांमध्ये वर्क कल्चरबाबत अनेकदा वाद होतात. अनेक वेळा कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण इतका जबरदस्त असतो, की 'माणुसकीची'ही लाज वाटू लागते. अशाच एका प्रकरणाने लोकांचे लक्ष वेधले आहे. ज्यामध्ये बॉसला आपल्या कर्मचाऱ्याने कार अपघात झाल्याचे कळवूनही बॉसला दया आली नाही. माणुसकी तर सोडाच; पण बॉसने असे काही मेसेज पाठवले, ते पाहून कोणालाही संताप येईल. इन्स्टाग्रामवर kirawontmiss या अकाऊंटवरून एक किस्सा शेअर करण्यात आला आहे. त्यात एका कर्मचाऱ्याला ऑफिसला जाताना अपघात झाला. यानंतर कर्मचाऱ्याला उशीर होऊ लागल्यावर त्याने त्याच्या तुटलेल्या कारचा फोटो त्याच्या बॉसला पाठवला. त्यामुळे गंभीर अपघात झाल्याचे स्पष्ट झाले;परंतु त्यानंतरही साहेबांनी दिलेले उत्तर पाहून लोक संतापले. मॅनेजरने चिंता व्यक्त करण्याऐवजी कर्मचाऱ्याला स्वतःबद्दलचे अपडेट्स देत राहण्यास सांगितले.

मॅनेजरने कर्मचाऱ्याला मेसेज लिहिला आणि म्हणाला,'तुम्ही ऑफिसला किती वाजता पोहोचता, त्याचे अपडेट मला देत राहा.' दिवसभरानंतरही प्रतिसाद न आल्याने मॅनेजरने दुसरा संदेश पाठवला. ज्यात त्यांनी लिहिले,' तुम्हाला उशीर का झाला हे समजण्यासारखे आहे; परंतु कुटुंबातील एखाद्याच्या मृत्यू तर झाला नाही ना? तसे असेल तरच सुट्टी मिळेल. ऑफिसला आलात नाही, तर कंपनी तुम्हाला माफ करणार नाही.' ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर 'सोशल मीडिया'वर यूजर्समध्ये नाराजी पसरली आहे. एका यूजरने लिहिले,मी अशा बॉससोबत काम करण्याऐवजी नवीन नोकरी शोधेन.

## विमानात सामान ठेवण्यावरून मारामारी



बसपासून ते दिल्ली मेट्रोपर्यंत, प्रवाशांना अनेक वेळा शिवीगाळ करताना आणि भांडताना अनेकदा पाहिले असेल. आता असे दृश्य विमानांमध्येही दिसू लागले आहे. ताजे प्रकरण एका खासगी विमानाचे आहे, जिथे केबिनमध्ये सामान ठेवण्यावरून दोन प्रवासी एकमेकांशी भिडले. हे विमान मुंबईला जाणार होते. दोन प्रवाशांमधील बाचाबाची एवढी वाढली की दोघांनीही एकमेकांना बघून घेण्याची धमकी देण्यास सुरुवात केली आणि या वादात एकाने त्या व्यक्तीला चापटीही मारली.

प्रवाशांच्या दोन गटांमध्ये काही मुद्द्यावरून भांडण झाले, त्यानंतर विमानात गोंधळ झाला. संपूर्ण उड्डाणाचे वातावरण एकमेकांना ओरडणे आणि धमक्यांमध्ये बदलले. फ्लाइटमध्ये आपल्या कुटुंबासोबत प्रवास करत असलेल्या एका व्यक्तीचा समोरील प्रवाशासोबत काही मुद्द्यावरून वाद झाला. आता हा वाद इतका वाढला, की कुटुंबासह चालक दलातील सदस्यांना मध्यस्थी करावी लागली. यानंतरही हाणामारी थांबली नाही आणि एकमेकांना अपमानित करण्याचा टप्पा सुरूच राहिला. बँकॉक-इंडिया फ्लाइटमधील प्रवाशांमधील बॉक्सिंगचा संपूर्ण सामना पाहावा लागला. क्रू पूर्णपणे अनभिज्ञ आहे. चौघांनी मिळून खिडकीजवळ सीटवर बसलेल्या व्यक्तीवर थप्पड आणि ठोसे मारले. वादाच्या भरात आधी करड्या रंगाचा टी-शर्ट घातलेल्या व्यक्तीने आपला चष्मा काढला आणि नंतर समोरच्या व्यक्तीच्या तोंडावर चापट मारली. आरडाओरडा करत कर्मचाऱ्यांना बोलावले. चार जणांनी मिळून एकट्या व्यक्तीवर हल्ला केला, त्यांच्यासोबत असलेल्या महिलांनी लोकांना मारण्यास नकार दिला, मात्र असे असतानाही चार ते पाच जणांनी एकट्या व्यक्तीवर हल्ला करून आपले शौर्य सिद्ध केले!

## टी शर्टचाच टॅटू काढला

फुटबॉल चाहत्यांचं खेळाप्रती असलेलं वेड आपण जाणतो. आपल्या देशाचा संघ हरला की चाहते दु:खावेगात बुडून जातात तर जिंकल्यावर त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. आपल्या आवडत्या खेळाडूसाठी चाहते जीवाचं रानही करतात. ब्राझीलमध्येही फुटबॉलचं वेड असंच ओसंडून वाहत असतं. मॉरिसियो डॉस एंजॉस नावाच्या तरुणाला फुटबॉलने झपाटून टाकलं आहे. त्याने संपूर्ण शरीर फुटबॉल टीमच्या जर्सीसारखं रंगवून घेतलं आहे. ब्राझीलमध्ये फ्लेमिंगो नावाचा फुटबॉल क्लब आहे. तो या क्लबचा चाहता आहे. त्यामुळे त्याने या संपूर्ण शरीर संघाच्या जर्सीसारखं रंगवून घेतलं आहे. लांबून बघितलं तर त्याने संघाची जर्सी घातल्यासारखं वाटेल. खरं तर त्याने शरीराला फक्त रंग लावलेले नाहीत तर टॅटू काढून घेतला आहे. त्याच्या शरीराचा ४० टक्के भाग टॅटूने व्यापला आहे. शरीरावर जर्सीसारखा टॅटू काढण्यासाठी त्याला ९० तास लागले. लहानपणापासूनच त्याला फुटबॉलचं वेड होतं. आपल्या आवडत्या फ्लेमिंगो संघाच्या जर्सीचा टॅटू त्याला काढायचा होता. पण वडिलांना आवडत नसल्याने त्याला ते जमत नव्हतं. पण १८ वर्षांचा झाल्यावर त्याने टॅटू काढायचा निर्णय घेतला. या टॅटूमुळे त्याच्या फॅन्सची संख्या वाढली आहे. सामना पहायला गेल्यावर लोक त्याच्यासोबत सेल्फी काढून घेतात.



## हाताचे पंजे नसताना

हातांचे पंजे नसतानाही तिने हस्ताक्षर स्पर्धा जिंकली! त्यामुळे तिचं सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. सारा हेन्स्ली असं या मुलीचं नाव. अवघ्या दहा वर्षांची सारा अमेरिकेतल्या मेरीलँडमध्ये राहते. तिला जन्मापासूनच हाताचे पंजे नाहीत. मात्र मध्यंतरी झालेल्या राष्ट्रीय स्तरावरच्या हस्ताक्षर स्पर्धेचं विजेतेपद तिने पटकावलं. साराला ५०० डॉलर आणि ट्रॉफी बक्षिस म्हणून देण्यात आली. यासोबतच या वर्षी १३ जून रोजी होणाऱ्या एका कार्यक्रमात सुंदर हस्ताक्षरासाठी तिला निकोलस मॅक्सिम पुरस्कारही देण्यात येणार आहे. सुदृढ व्यक्ती एका हाताने लिहू शकते. मात्र साराने दोन्ही हातांनी लिहिण्याचं कौशल्य आत्मसात केलं आहे. सारा याच वर्षी वेगळ्या पद्धतीने लेखन करण्याची कला शिकली. विशेष म्हणजे सारा निकोलस मॅक्सिम पुरस्कार जिंकणारी शाळेतली पहिलीच विद्यार्थिनी असल्याचं मुख्याध्यापिका कॅथी स्मिथ सांगतात. हाताचे पंजे नसल्याचा विचार आपल्या मनाला शिवतही नसल्याचं साराचं म्हणणं आहे. आपल्यात काही तरी व्यंग आहे, असा विचार करण्यात काहीच अर्थ नसतो असं ती सांगते. अशी ही सुंदर हस्ताक्षर असलेली सारा मेरीलँडमध्ये



## अडीच हजार वर्षांपूर्वीची ममी

इजिप्त हा देश ममींसाठी प्रसिद्ध आहे. इजिप्तची राजधानी कैरोपासून १६५ मैल लांब असलेल्या अल घोरिफा इथल्या एका कब्रस्थानात अडीच हजार वर्षांपूर्वीची ममी सापडली आहे. यासोबतच बऱ्याच पुरातन वस्तूही सापडल्या आहेत. या वस्तू बघून पुरातत्त्व विभागातल्या लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. विशेष म्हणजे या संशोधनाचं थेट प्रसारणही करण्यात आलं. जॉस गेट्स आणि जाही हवास यांनी हे संशोधन केलं असून 'डिस्कव्हरी' वाहिनीवर ही सर्व प्रक्रिया थेट प्रसारित करण्यात आली. 'एक्सपिडिशन अननोन : इजिप्त लाईव्ह' असं या कार्यक्रमाचं नाव होतं. ही ममी सोन्यामध्ये मढवली होती. यासोबतच इतर दोन ममीही सापडल्या आहेत. एका कुटुंबाला इथे दफन करण्यात आल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. इथे चार ते पाच काचेच्या बाटल्या, कुत्र्याची हाडं, जुन्या काळातल्या खेळाची सामुग्री अशा काही वस्तू सापडल्या आहेत. या ममींवर काही संदेशही लिहिण्यात आले असून त्यावरून काही अंदाज बांधले जात आहेत. या ममींच्या शोधामुळे काही ऐतिहासिक घटनांबाबत माहिती मिळेल, अशी अपेक्षा आहे.



## म्हणून ते खातात स्वत:च्याच पिलांना

काही पक्षी आणि प्राणी आपल्याच पिलांना खाऊन टाकतात. यामागची नेमकी कारणं शोधण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न होता. आता त्यांना यात यश आलं आहे. ऑक्सफर्डच्या शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार जास्त झाली आहेत. भूक लागल्यावर प्राणी, पक्षी पिलांना खातात, असा शोध लावण्यात आला होता. मात्र आता याच्या कारणांवर अधिक प्रकाश टाकण्यात आला आहे.



प्रमाणात पिलांचा जन्म झाला तर भविष्यात त्यांना खाणं उपलब्ध करून देता येणार नाही हा विचार करून सजीव काही पिलांना खाऊन टाकतात. ससा, मासा, कोंबड्या आपल्याच पिलांना खातात. बोकाही आपल्या पिलांना खात असल्याचं ऐकीवात आहे. अनेकदा संकटकाळात पक्षी, प्राणी पिलांना खातात. पाण्यात ऑक्सिजनची कमतरता निर्माण झाली तर नर डेमसेलफिश आपल्या पिलांना खाऊन टाकतो. याआधीही याबाबत संशोधनं अमेरिकेतल्या टेनिसी विद्यापीठानेही याबाबत संशोधन केलं. या संशोधनासाठी शास्त्रज्ञांनी अंड्यातून पिलं बाहेर येईपर्यंतच्या प्रक्रियेची चाचणी केली. आपल्या इतर पिलांना वाचवण्यासाठी पक्षी, प्राणी काही पिलांचा त्याग करतात. काहींना दूर सोडून येतात. पिलांच्या वाढत्या संख्येमुळे त्यांना त्यांची नीट काळजी घेता येत नाही. त्यामुळे पिलं खाण्याचा पर्याय निवडला जातो.



## आईसारखं दिसायचंय!

बँकॉकमध्ये सध्या आई आणि मुलाची जोडी चांगलीच चर्चेत आहे. याचं कारण हा मुलगा आईसारखं दिसण्यासाठी तिच्यासारखेच कपडे घालतो. या दोघांचे एकत्रित फोटो चांगलेच व्हायरल झाले आहेत. त्यांचं एकत्रित इंस्टाग्राम खातंही आहे. त्यावर एक लाख २८ हजारपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. आईचं नाव ली तर मुलाचं नाव पेप्पी आहे. हे दोघं एकमेकांसाठी सारखेच कपडे खरेदी करतात. म्हणजे एकाच वेळी एकाच पद्धतीच्या कपड्यांच्या दोन जोड्या खरेदी केल्या जातात. लहानपणापासूनच पेप्पीला आईसारखं दिसायचं होतं. तरुणपणी आपलं हे स्वप्न पूर्ण झाल्याचं तो सांगतो. ली आणि पेप्पी मीडियाशी फार बोलत नाहीत. या दोघांनी नुकतीच पहिली मुलाखत दिली. इंस्टाग्रामवर अकाउंट सुरू केल्यानंतर आपण सारखे कपडे घालायला सुरूवात केल्याचं पेप्पी सांगतो. आईसारखं दिसण्याची कल्पना पेप्पीची होती. आईचे फॅशनेबल कपडे त्याला खूप आवडायचे. लहानपणी तो आईसारखं वागायचा, राहण्याचा प्रयत्न करत असे. हे दोघं फोटो शूट करून घेतात. त्यांच्या घरातच फोटो शूटचं आयोजन केलं जातं. घरातले नोकरचाकर त्यांचे फोटो काढतात. फोटो काढण्यासाठी आपण फार काही करत नसल्याचं पेप्पीचं म्हणणं आहे. आपण फार भपकेबाजी करण्याच्या फंदात पडत नसल्याचं तो सांगतो.

## ‘सिद्धार्थ वाणी’

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



### “ज्ञानपंचमी”

आज ज्ञानपंचमी. जैन धर्माशी संबंधित ज्ञानपंचमी हा प्रत्येकासाठी अत्यंत आदरणीय आणि महत्त्वाचा दिवस आहे. ‘ज्ञानपंचमी’ हा सण कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो. या शुभ मुहूर्तावर भगवान महावीरांचे तत्वज्ञान लिखित स्वरूपात पुढे आणले गेले. आता ज्ञान श्रुती परंपरेच्या पुढे आहे. ज्यामध्ये भगवान महावीर स्वामी प्रवचन देत असत आणि त्यांचे मुख्य शिष्य हे ज्ञान सर्वांना देत असत. यापूर्वी भगवान महावीरांचे प्रवचन लिहिण्याची परंपरा नव्हती. ऐकल्यावरच आठवले, म्हणूनच त्याचे नाव ‘श्रुत’ पडले. ज्ञानपंचमी ज्याला श्रुत पंचमी असेही म्हणतात. या दिवशी जैन धर्मग्रंथांची पूजा केली जाते आणि शास्त्रांचा अभ्यास आणि स्मरण केले जाते. पूर्वी जैन ज्ञान आचार्य परंपरेद्वारे तोंडी प्रसारित केले जात होते.

दिवाळीच्या पाचव्या दिवशी ज्ञानपंचमी हा सण साजरा केला जातो. ज्ञानपंचमीच्या दिवशी ज्ञानाचा विस्तार होतो. ज्ञान हे कृतीचे बंधन आहे. ज्ञानानेच आपण आपले कर्म शुद्ध करू शकतो. ज्ञानाचा महिमा समजून घेणे आणि त्याची जाणीव करून देणे म्हणजे ज्ञानपंचमी. ज्ञानपंचमीसंदर्भात अनेक कथा ऐकायला मिळतात.

*** ज्ञानपंचमीचे महत्त्व :–** जैन समाजातही हा दिवस विशेष महत्त्वाचा असल्याचे सांगितले जाते. यादिवशी पहिला जैन धर्मग्रंथ लिहिला गेला. अनेक आचार्यांनी भगवान महावीरांच्या ज्ञानाचा आदर केला, जी एका ग्रंथात रचली गेली आणि ज्येष्ठ शुक्ल पंचमीला सादर केली गेली. धरसेनाचार्यांनी पुष्पदंत आणि भूतबली यांच्या साहाय्याने शतखंडगम नावाचा ग्रंथ रचला, ज्यामध्ये जैन धर्माशी संबंधित माहिती मिळते. या दिवसापासून श्रुत परंपरा लिखित परंपरेने मांडली गेली. हा शुभ दिवस श्रुतपंचमी म्हणून साजरी केली जाते. हा एक निधीच आहे. जो विस्तारित केल्यावर विस्तारतो, जीवनाचा मार्ग नेहमी प्रकाशित करतो. **– सौ. सविता चोरडिया**





शहरातील दिव्यांग बांधवांनी घेतली मतदानाची शपथ घेतली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी रस्त्याच्या कामाची पाहणी केली. (छाया – लहू दळवी)

# शहरातील दिव्यांग बांधवांनी घेतली मतदानाची शपथ

### विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेकडून जनजागृती

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत शहरातील दिव्यांग बांधवांनी महानगरपालिकेत १०० टक्के मतदानाचा संकल्प करत शपथ घेतली. त्यांच्याकडून स्वयंघोषणापत्र देखील घेण्यात आले. सर्व दिव्यांग बांधव मतदानाचा अधिकार पूर्णपणे बजावणार असल्याचे संकल्प पत्र देखील भरून घेण्यात आले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, शहरातील विविध घटकातील नागरिक दिव्यांग बांधव तृतीयपंथी आदींमध्ये जनजागृती करून शंभर टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली जात आहे. महानगरपालिकेच्या बस सेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेतले जात आहेत महापालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात आहे.

### नागरिकांशी थेट संवाद साधताना रस्त्यांच्या कामांचाही घेतला आढावा

मतदार जागृतीसाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी थेट रस्त्यावर उतरून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पत्रकार चौक ते दिल्लीगेट या रस्त्याच्या कामाची पाहणी करत कामाचा आढावा त्यांनी घेतला. कामामुळे वाहतुकीस अडथळा होत असला तरी भविष्यात चांगले रस्ते उपलब्ध होणार असल्याने व कायमचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरिकांनी समाधानही व्यक्त केले. रस्त्याचे काम सुरू असताना नागरिकांना वाहतुकीस अडथळा होणार नाही, यादृष्टीने शक्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही आयुक्त यशवंत डांगे यांनी ठेकेदार संस्थेला दिल्या आहेत.

# विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांचे दैनंदिन खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रहमधील लेख्यांची तपासणी या तरतूदीनुसार जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी सर्व मतदारसंघातील उमेदवारांनी ठेवलेल्या दैनंदिन निवडणूक खर्चाची तपासणी खर्च निरिक्षक यांच्यामार्फत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात करण्यात येणार आहे.

खर्च तपासणीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. अकोले मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. संगमनेर मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

शिर्डी मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. कोपरगाव मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

राहुरी मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. श्रीरामपूर मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

नेवासा मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. शेवगाव मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

कर्जत जामखेड मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. श्रीगोंदा मतदारसंघाची पहिली तपासणी ९ नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

पारनेर मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० या वेळेत होणार आहे. अहमदनगर मतदारसंघाची पहिली तपासणी १० नोव्हेंबर रोजी, दुसरी तपासणी १४ नोव्हेंबर आणि तिसरी तपासणी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे.

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे खर्च संनियंत्रण कक्षाचे समन्वयक अधिकारी तथा मुख्य वित्त व लेखा अधिकारी शैलेश मोरे यांनी कळविले आहे.




तहसील कार्यालयात आयोजित बैठकीप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील व इतर अधिकारी.

## निवडणूक खर्चाबाबत उमेदवार व प्रतिनिधींसोबत बैठक

नगर – अहमदनगर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधीसमवेत तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

बैठकीस अपर तहसीलदार स्वप्निल ढवळे, निवडणूक खर्च पथक प्रमूख जुगल किशोर लोहिया, प्रवीण विसरे, निवासी नायब तहसीलदार अनिल तोरडमल उपस्थित होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी उपस्थित उमेदवार व प्रतिनिधींना निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या खर्चाच्या मर्यादेबाबत तसेच उमेदवारांनी दैनंदिन अहवाल देताना घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले. मास्टर ट्रेनर राजेंद्र चव्हाण यांनी सविस्तर माहिती दिली.

# नगरमध्ये घरफोडी करणाऱ्या २ अल्पवयीन मुलांना पकडले

### चोरलेले सोने, मोबाईल हस्तगत, तोफखाना पोलिसांची कारवाई

नगर – येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात वरीष्ठ लिपीक पदावर कार्यरत असलेले योगेश ज्ञानदेव दिवटे (वय ३७ रा. डॉक्टर वसाहत, जिल्हा रुग्णालय, पत्रकार चौक) यांचे घर फोडणाऱ्या २ अल्पवयीन मुलांना तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून सोन्याचे दागिने व मोबाईल असा २१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

योगेश ज्ञानदेव दिवटे यांच्या पत्नी कल्याणी दिवटे या परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी २८ ऑक्टोबरला दुपारी चार वाजता दिल्लीगेट येथे गेल्या होत्या. त्यानंतर चोरट्यांनी त्यांचे घर फोडून घरातील सामानाची उचकापाचक केली व सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा ४८ हजारांचा ऐवज चोरून नेला. त्या सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास घरी आल्यानंतर घर फोडून चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पती योगेश यांना माहिती दिली. योगेश दिवटे यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी गुन्हे शोध पथकाच्या पोलिसांना तपास करण्याचे आदेश दिले होते.

गुन्हे शोध पथकाच्या पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. संशयित आरोपीचा शोध घेत असताना सदरचा गुन्हा २ अल्पवयीन मुलांनी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्या अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी पो.नि. कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शैलेश पाटील, अंमलदार दत्तात्रय जपे, भानुदास खेडकर, अहमद इनामदार, सुनील शिरसाठ, सुरज वाबळे, सुधीर खाडे, गणेश धोत्रे, वसीम पठाण, राहुल म्हस्के, सुमीत गवळी, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, सतीश भवर, सतीश त्रिभुवन, बाळासाहेब भापसे यांनी केली आहे.

# बोल फाऊंडेशनद्वारे दिवाळीनिमित्त आनंदोत्सव

नगर – भारत देशात दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण व मांगल्याचे प्रतिक. या प्रकाशाद्वारे प्रत्येकाच्या जीवनात अंध:कार दूर व्हावा व सुखसमृध्दी नांदावी या हेतूने हा सण साजरा करण्यात येतो दिवाळी या नावातच आनंद व उत्सव या शब्दांचा उल्लेख आहे. आनंदाचा व कृतज्ञतेचा हा सोहळा मानला जातो. वाईटावर चांगल्या विजयाचा उत्सव म्हणून या सणाकडे पाहीले जाते. त्याचप्रमाणे सर्वांनी एकत्रित येऊन नुतनीकरणाचा म्हणून हा सण साजरा केला जातो.

हा उदात्त हेतु लक्षात घेऊनच ब्रेड ऑफ लाईफ, बोल फाऊंडेशनने एक सामाजिक उपक्रम राबवण्याचे ठरवले. इंदिरानगर सेवावस्ती भिंगार येथील गरजु, गरीब, निराधार दुर्लक्षित कुटूंबाना दिवाळी निमित्त मिठाई पुडयांचे वाटप करुन प्रत्येक परिवारामध्ये गोडवा व आनंद निर्माण करण्याचा एक छोटासा प्रयत्न करण्यात आला.



बोल फौंडेशनच्यावतीने दिवाळीनिमित्त आनंदोत्सव साजरा करताना लहान मुलांना मिठाईचे वाटप करताना भाऊसाहेब गवळी, स्वयंसेवक.

३ नोव्हेंबर भाऊबीज या दिवशी १८७ कुटूंबियांना आणि भिंगार येथील परिसरातील गरजुंना फाऊंडेशनमधील स्वयंसेवकांद्वारे मिठाई पुडयांचे वाटप करण्यात आले या प्रसंगी इंदिरानगर सेवावस्तीतील सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब अण्णा गवळी, विनोद उमाप, दिनेश जाधव, सुनिल वैराळ, आकाश मोरे, धनंजय घोरपडे, नंदाताई रॉय व सागर कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले बोल फाऊंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे यांनी दिवाळी सणाच्या आनंदोत्सवाचे महत्व थोडक्यात सांगितले. त्याचप्रमाणे संस्थेचे सहसंस्थापक अमित पाटोळे यांनी मिठाईचे वाटप या उपक्रमाचे नियोजन उत्तमरित्या पार पाडले. संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांनी हा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी चर्चेद्वारे प्रभावी नियोजन करुन कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यास ते प्रयत्नशील राहीले.

संस्थेचे स्वयंसेवक अंतोन पाटोळे, वैभव पाटोळे, सौरव पाटोळे, आशय पाटोळे यांचे मोलाचे योगदान लाभले. अशा प्रकारे इंदिरानगर, सेवावस्तीतील सामाजिक कार्यकर्ते श्री. अण्णा गवळी व सौ. नम्रता भोसले यांनी बोल फाऊंडेशन करित असलेल्या विविध सामाजिक उपक्रमाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. शेवटी संस्थेचे सहसंस्थापक अमित पाटोळे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# दिव्यांग अनुदानाची जमा झालेल्या अधिकच्या रक्कमेची महानगरपालिकेकडून वसुली सुरू

### दिव्यांगांच्या कुटुंबियांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न, न्याय देण्याची आयुक्तांकडे मागणी

नगर – दिव्यांग मासिक उदरनिर्वाह अनुदान योजनेंतर्गत नजरचुकीने लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झालेली अधिकची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही महापालिकेने सुरु केली आहे. तथापि लाभार्थ्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला असून, या प्रकरणात आपल्याला न्याय द्यावा, अशी मागणी दिव्यांगाची आई नजहत अश्पाक बेग यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात श्रीमती बेग यांनी म्हटले आहे की, माझा मुलगा परवेज अश्पाक बेग हा दिव्यांग असून, मी लोकांची धुणीभांडी करून आमचा उदरनिर्वाह चालवतो. घरात मी आणि मुलगा असे दोघेच आहोत. परवेज बेग यास दिव्यांग उदरनिर्वाह अनुदान योजनेंतर्गत दरमहा तीन हजार रुपये मिळतात. परंतु मागील ७ महिन्यांपासून दरमहा ६ हजार रुपये जमा होत होते. याची मला कुठलीही कल्पना नव्हती. पैसे जमा झाल्यावर मी ते उदरनिर्वाहासाठी काढून घेत होते. परंतु मागील तीन महिन्यांपासून कुठलीही रक्कम जमा होत नसल्याने महापालिकेत चौकशी केली त्यावेळी मला कळले की, महापालिकेने ३३ हजार रुपये दंड केला आहे. जादा जमा झालेली रक्कम अनुदानातून वसूल करून घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे माझ्यापुढे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून, याबाबत मला न्याय द्यावा, असे श्रीमती बेग यांनी म्हटले आहे.



**शिवसेना जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिषेक कळमकर यांना जाहीर पाठिंबा**

शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांनी नगर शहर विधानसभा मतदार संघातील महविकास आघाडीचे अधीकृत उमेदवार अभिषेक कळमकर यांना आपला जाहीर पाठींबा दिला आहे, अशी घोषणा त्यांनी खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषेदत केली. यावेळी माजी आमदार दादाभाऊ कळमकर, उमेदवार अभिषेक कळमकर, शहर प्रमुख संभाजी कदम, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, विक्रम राठोड, योगीराज गाडे आदी उपस्थित होते



## महाविकास आघाडीला संपूर्ण राज्यात पाठिंबा जाहीर

मुस्लिम समाजाचे इस्लामिक न्यायाधीश आणि अखिल भारतीय इन्सानियत अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष खादिम–ए–इन्सानियत मुफ्ती सालीम यामानी यांनी उद्धव ठाकरेंना संपूर्ण महाराष्ट्रात पाठिंबा दिला आहे. न्याय आणा, मानवता वाचवा. द्वेषाच्या आगीपासून देशाला वाचवा हा नारा देत हिंदू–मुस्लीम समाज एकत्र येईल आणि महाविकास आघाडीला पूर्ण पाठिंबा देईल, असे त्यांनी म्हटले आहे.

